## प्रकरण तिसरे

## ।। "शांतता ! कोर्ट चालू आहे" नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण ।।

## ××× प्रकरण तिसरे ×××

## ××× "शांतता कोर्ट चालू आहे" नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण ×××

### प्रास्ताविक :::

आज जीवनाचा वेग झपाटयाने वाढला आहे. स्त्री जीवनाच्या कक्षाही रुंदावत आहेत. स्त्री-मुक्ती, स्त्री-स्वातंत्र्य या प्रश्नांनी सारा देश ढवळून निघत आहे. आपल्या देशाची एकविसाव्या शतकाकडे वाटचाल चालू असताना, स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन तितकासा निकोप आहे काय ? असा प्रश्न पडतो. आजही भारतीय स्त्रीची स्थिती समाधानकारक नाही, असे चित्र स्पष्टपणे दिसते. एकीकडे स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार दिसतो, तर दुसरीकडे स्त्रीची मुस्कटदाबी दिसते. आजही समाजव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान बरोबरीचे नाही. तिच्याकडे दुय्यम किंवा अबला म्हणून पाहिले जाते. रूढी-परंपरेच्या दुष्टचक्रात ती अडकलेली आहे. त्यामुळे स्त्रीच्या जीवनाची वाताहात होते. पिळवणूक, अत्याचार यांनी तिची गळचेपी होते. अगदी सुशिक्षित स्त्री देखील पारंपरिक वातावरणामुळे पुरुषी वर्चस्वाच्यावरवंटयाखाली चिरडली जाते. अगदी अल्प स्त्रिया स्वतःच्या कर्तृत्वावर यशाचे शिखर काबीज करताना दिसतात. परंतु त्यासाठी त्यांना निर्धाराने कुटुंबाशी, समाजाशी लढा द्यावा लागतो.

समाजजीवन हे परिवर्तनशील असल्याने स्त्रीच्या बालविवाह, सती, केशवपन इत्यादी समस्या कालबाहय होवून नवविचारी, शिक्षित स्त्रीच्या तसेच प्रौढ कुमारिकांच्या, कुमारी मातांच्या विविध समस्या निर्माण झाल्या. एक माणूस म्हणून स्त्रीकडे पाहिले जात नाही. तिला समान हक्क, न्याया पासून वंचित केले जाते. समाजमनावर रूढीपरंपरेचा जबरदस्त पगडा आहे. याचा परिणाम म्हणूनच कुमारी मातृत्वाने ग्रस्त असलेल्या स्त्री-कडेही सहानुभूतीने पाहिले जात नाही. आपली मातृत्वाची कल्पना रूढीपरंपरेशी निगडीत आहे. मातृत्व हे निसर्गनिर्मित असलेतरी, विवाहबाहय मातृत्व हे सामाजिक नीतिसंकेतात बसत नाही. त्यामुळे असे मातृत्व अपवित्र व निषिध्द मानले जाते. अशा प्रसंगी, समतोल बुध्दीने विचार करून, नेमका दोष कोणाचा हे लक्षात न घेता, केवळ कुमारी मातेला दोषी ठरवून, समाजाकडून तिचा अतोनात छळ केला जातो. समाजशक्तीपुढे तिचे बळ अपुरे पडते. सामाजिक नीतिसंकेतांचे दुष्परिणाम त्या असहाय्य स्त्रीला सोसावे लागतात. तिला गुन्हेगार समजून तिची मानसिक कुचंबना केली जाते. गर्भ जोपासण्याची, अपत्य वाढवण्याची तिची प्रबळ, नैसर्गिक भावना समाजाला नामंजूर असते. अशा कुमारी

मातेच्या भावभावनांचा विचार न करता समाज तिच्या बाबतीत किती भयानक थराला जावून हिंस्त्र वागतो, याचे चित्तथरारक दर्शन तेंडुलकरांनी **"शांतता! कोर्ट चालू आहे"** या नाटकात घडविले आहे. मानवी स्वभावातील हिंस्त्रता, अमानुषता यांचे भीषण चित्र प्रस्तुत नाटकात प्रकर्षाने जाणवते.

विजय तेंडुलकर यांचे, **कुमारी मातृत्वाची समस्या चित्रीत करणारे** "शांतता! कोर्ट चालू आहे" हे नाटक **रचना** आणि **व्यक्तिचित्रणाच्या** बाबतीत वैशिष्टयपूर्ण व श्रेष्ठ आहे. **या नाटकाच्या निर्मितीमागील पार्श्वभूमी** तेंडुलकरांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेत सांगितली आहे. एकदा पार्ल्यात काही मंडळी नवरात्रात अभिरूप न्यायसभेचा कार्यक्रम करण्यासाठी आली होती. या मंडळींना कार्यक्रमाचे सभागृह दाखविण्याचे काम तेंडुलकरांनी केले. त्यावेळी त्यांनी कार्यक्रमाची चर्चा ऐकली. तेथेच त्यांना **"शांतता! कोर्ट चालू आहे"** नाटकाचा विषय मिळाला. **सौ. शिरीष पै** यांच्या एका सुंदर कवितेतून त्यांच्यासमोर कु. लीला **बेणारेची** मध्यवर्ती व्यक्तिरेखा आली. प्रस्तुत नाटकात बेणारेच्या तोंडी ही कविता टाकली आहे. याशिवाय नाटक उभारणीसाठी तेंडुलकरांना, ख-याखोटया न्यायसभेशी संबंधित असणा-या काही नाटक, चित्रपट व पुस्तकांचा उपयोग झाला. **"वुई आर नो एंजल्स"** हया इंग्रजी नाटकावरच्या ब-याच जुन्या चित्रपटाचा, **डयुरेनमात** या जर्मन कादंबरीकाराच्या **"डेंजरस गेम"** या मातब्बर कादंबरीचा, **आचार्य अत्रे** यांच्या **"डॉ. लागू"** या नाटकातील शेवटच्या अंकाचा आणि **जे. बी. प्रीस्टली** यांच्या **"टाईम प्लीज"** चा प्रत्यक्षाप्रत्यक्ष उपयोग झाल्याचा उल्लेख तेंडुलकरांनी कृतज्ञतापूर्वक केला आहे[१] आणि प्रस्तावनेच्या अखेरीस **"या नाटकाचा गाभा आणि त्यात व्यक्त झालेले जीवन शंभर टक्के येथले आहे"**[२] असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. असा निर्वाळा देण्याचे कारण म्हणजे त्या नाट्यकृतीचा भारतीय समाजव्यवस्थेशी असणारा संबंध स्पष्ट व्हावा, हेच असावे.

तेंडुलकरांनी **"शांतता! कोर्ट चालू आहे"** नाटकाच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत, नाटक निर्मितीसाठी कशाकशाची मदत झाली हे स्पष्ट करून सुध्दा "शांतता! कोर्ट" परकीय नाटकावर आधारलेले आहे अशी चर्चा झाली.[३] त्यामुळे हे नाटक वादग्रस्त ठरले. **तेंडुलकरांचे "अशी पाखरे येती"** हे नाटकही असेच वादग्रस्त ठरले. सदर नाटकांच्या प्रस्तावना पाहिल्या असता, तेंडुलकरांचा प्रामाणिकपणा लक्षात येतो. त्यांची नाटके परकीय कल्पनांवर आधारित असली तरी ती अनुवादित नाहीत. एकवेळ त्यांची नाटके स्वतंत्र नाहीत असे म्हटले तर त्याचे तेंडुलकरांना काही वाटत नाही. परंतु ती अनुवादित

आहेत असे म्हटले तर त्यांच्या मनाला लागते. **"शांतता! कोर्ट चालू आहे"** हे नाटक माझ्या दृष्टीने फार माझं आहे."[४] असे नमूद करून तेंडुलकर म्हणतात, **"शांतता"** हे माझ्या **भोवतालच्या माणसांचं आहे.** माझ्या **जगण्याचं,** माझ्या **आयुष्याचं हे नाटक** आहे हे नाटक स्वतंत्र आहे असा मी कधीही ओरडून दावा करणार. कुणी काही म्हणोत,मला त्याच्याशी कर्तव्य नाही. पण हे अनुवादित आहे असं म्हटलं जातं तेव्हा, अनुभव इथला नाही, माणसं इथली नाहीत असं म्हटलं जातं, आणि हा मला त्या अनुभवांचा आणि माणसांचा सर्वात मोठा अपमान वाटतो. मला तो फार झोंबतो. मी इतकंच सांगेन की, त्याला फार तर आपण स्वतंत्र म्हणू नका."[५]

**"शांतता! कोर्ट चालू आहे"** नाटकनिर्मितीमागील कल्पना परकीय साहित्यावर आधारलेली असलीतरी, या नाटकात व्यक्त झालेले जीनानुभव व चित्रीत केलेली स्त्री समस्या इथली, या मातीतली आहे. निषिध्द मातृत्व ही सनातन काळापासून चालत आलेली स्त्री समस्या आहे. पुराणकाळातील सत्यवती आणि कुंती यांच्या वाटयाला ही समस्या आली. समाजाचा रोष ओढवून घ्यायला नको म्हणून कुंतीने आपले कुमारी मातृत्व लपवून ठेवले. **"शांतता! कोर्ट"** मधील **बेणारे** सारखी स्त्री ही याच हेतूने आपले कुमारी मातृत्व झाकण्याचा प्रयत्न करते. मातृत्व ही जरी निसर्गाने स्त्रीला दिलेली देणगी असली तरी, ते सामाजिक नीतिसंकेतात बसणारे नसले तर समाजास ते पवित्र वाटत नाही. कुमारी मातृत्वाकडे समाज क्षमाशीलदृष्टीने पाहात नाही. निषिध्द मातृत्वाकडे पाहण्याचा, समाजाचा दृष्टिकोन कसा अनुदार, स्त्रीस अपमानित, घायाळ करणार असतो, याचे प्रत्यंतर तेंडुलकरांनी "शांतता! कोर्ट" मध्ये घडविले आहे. आणि म्हणूनच तेंडुलकरांची ही नाट्यकृती भारतीय समाजव्यवस्थेचे भेदक दर्शन घडविते. त्यादृष्टीने त्यांनी प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या अखेरीस दिलेला निर्वाळा सार्थच आहे.

**डॉ.श्रीराम लागू** यांनी "शांतता! कोर्ट" मधील स्त्री समस्येसंबंधी व नाट्यप्रयोगासंबंधी केलेले भाष्य ही येथे नोंदवणे गरजेचे आहे. समाजाच्या संकुचित व सहानभूतीशून्य दृष्टिकोनावर त्यांनी केलेले भाष्य अतिशय मार्मिक व परखड आहे.

**××× डॉ.श्रीराम लागू यांचे भाष्य : "एका चिमणीच्या हत्येचा खेळ" ×××**

डॉ.श्रीराम लागू यांनी "शांतता! कोर्ट चालू आहे" नाट्यसंहितेच्या प्रारंभी **"एका चिमणीच्या हत्येचा खेळ"** या शीर्षकाखाली, एका चिमणीच्या हत्येचा मार्मिक प्रसंग रेखाटून नाटकातील स्त्री समस्येची चिकित्सा केली आहे. चमचमीत पदार्थ तयार होईपर्यंतचा खेळ मजेत

घालविण्यासाठी घरातील पोरे एका गोजिरवाण्या चिमणीशी खेळतात. निर्दयपणे तिला घायाळ करतात. पदार्थ तयार होताच झाले गेले विसरून जातात. चिमणी हे केवळ प्रतीक आहे एका असहाय्य स्त्रीचे! मुर्दाड समाजाकडून केली जाणारी स्त्री विटंबना, अमानुषकृती डॉ.लागू वरील प्रसंगातून स्पष्ट करतात. आरोपीच्या पिंज-यात उभ्या केलेल्या बेणारेला छळणा-या हिंस्त्र, रानटीवृत्तीच्या समूहाचे वर्णन मानवतेला कलंक फासणारे आहे. डॉ.लागू म्हणतात, "आरोपीचे जितके अधिक वाभाडे निघतील, जितके अधिक लचके तुटतील, जितके अधिक रक्त गळेल, तितकी खेळाला अधिक मजा येणार आहे. इकडे तिकडे विखुरलेली पिसे, रक्ताचे लालभडक डाग, कोथळा बाहेर पडलेला देह बघायला मिळाला की, चाकोरीतल्या, मुर्दाड आयुष्यातला एक क्षण तरी थरारून जाणार आहे. मग त्या करता कुणाचा बळी जाणार आहे याची क्षिती कशाला ?"[६]

रुढीपरंपरेच्या दुष्टचक्रात सापडलेल्या अल्लड व मनस्वी बेणारेविषयी लागूंना कमालीची सहानुभूती वाटते. पिढयानपिढया समाजाने उराशी बाळगलेल्या नीतिकल्पनांशी विसंगत असे वर्तन तिच्या हातून घडल्यामुळे समाजाचा रोष तिला ओढवून घ्यावा लागतो. अभिरूप न्यायसभेच्या कार्यक्रमाच्या नावाखाली समूह बेणारेवर जाणीवपूर्वक हल्ला चढवून करमणूक करून घेतो याची लागूंना चीड येते. त्यांच्या मते, "एका महत्वाकांक्षेपोटी किंवा सूडापोटी आलेले हे क्रौर्य नाही. हे क्रौर्य अर्थशून्य, हेतूशून्य आहे. जिवाची घटकाभर करमणूक एवढाच अर्थ त्या अमानूष क्रौर्याला असलातर आहे."[७] आपले सामाजिक, कायदेशीर, नैतिक सुळे परजत हा समूह बेणारेचे लचके तोडतो. लागू म्हणतात,"आपल्या अवतीभवती प्रत्यही दिसणारी केवळ पाचसहा पात्रे घेवून तेंडुलकरांनी या मुर्दाड समाजाचे मोठे प्रत्ययकारी चित्र आपल्यापुढे उभे केले आहे."[८]

समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कोता, उथळ, सहानुभूतीशून्य आहे. स्त्री हृदयाचे आक्रंदन ऐकण्यासाठी समाजाला कान नाहीत. लागूंच्या मते, बेणारेची भूमिका समजावून घेण्यासाठी मनाचा थोडासा ओलावा, थोडा हळूवारपणा, मनाचा मोठेपणा आवश्यक आहे. नाटकाच्या अखेरीस पोपट चिमणीला विचारतो, --"का ग तुझे डोळे ओले?"[९] हा संदर्भ लागूंना "इंपोटंट इंटेलेक्चुअल" वाटतो.[१०]

सामाजिक वर्तनावर व स्त्री समस्येवर डॉ.लागूंनी केलेले भाष्य आपणास अंतर्मुख करते. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याची त्यांची उदार व मानवतावादी दृष्टी येथे दिसते. "एक जबरदस्त ताकदीचे मराठी नाटक"[११] म्हणून ते "शांतता! कोर्ट" चा गौरव करतात.

परंतु असे हे नाटक मराठी प्रेक्षकांनी फेकून दिल्याचे व त्याचे केवळ तीस प्रयोग झाल्याची खंत व्यक्त करतात. या सर्वश्रेष्ठ नाटकावर कोरडी बुध्दिबाज चर्चा करण्यापेक्षा, मनाला विलक्षण अस्वस्थ आणि उन्नत करणा-या कलात्मक अनुभवाचा मोकळ्या मनाने आस्वाद घेणे आवश्यक आहे"[१२] असे लागूंना वाटते. डॉ.लागूंनी समाजाच्या हिंस्त्र प्रवृत्तीवर नोंदवलेली परखड प्रतिक्रिया व स्त्री समस्येची केलेली चिकित्सा, प्रस्तुत अभ्यास विषयास उपयुक्त ठरते.

"शांतता! कोर्ट" मधील कुमारी मातृत्वाच्या स्त्री समस्येचे स्वरूप व चित्रण विविध अंगाने विचारात घेण्यासाठी तेंडुलकरांनी कोणकोणत्या युक्त्या योजल्यात ते पाहणे आवश्यक ठरते. नाटककाराने नाटकातील दृष्यातून, संविधानातून गुंफलेला आशय महत्वाचा असतो. म्हणून या नाटकाचे संविधानात्मक स्वरूप पाहूया.

### ××× "शांतता! कोर्ट चालू आहे" नाटकाचे संविधानक ×××

"शांतता! कोर्ट चालू आहे" हे तीन अंकी नाटक तारूण्यसुलभ वासनेला बळी पडलेल्या प्रौढ कुमारिकेची कोंडी चित्रीत करते. अभिरूप न्यायालयाचा कार्यक्रम सादर करून, समाज उदबोधन करण्यासाठी, मुंबईहून काही मंडळी एका आडगावी येतात. सदर कार्यक्रमात काम करणारी एक व्यक्ती गैरहजर असल्यामुळे त्या भूमिकेसाठी त्याच गावातील सामंतांना तयार करतात व त्यांना न्यायालयाचे कामकाज समजावे म्हणून कार्यक्रमाची तालीम सुरु होते. प्रथम आरोपी कोणी व्हायचे म्हणून चढाओढ लागते. अखेरीस पोंक्षे, सुखात्मे योजनाबध्दरितीने बेणारेला आरोपी करावयाचे ठरवितात. बेणारे हीच नाटकाची मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. ती एक अल्लड, अवखळ, फटकळ स्वभावाची तरूण स्त्री आहे. शाळेच्या विश्वात रमणारी होणारी ती हरहुन्नरी शिक्षिका आहे. परंतु तिच्याकडून कोणतातरी प्रमाद घडला असल्याची शंका, "या नोकरीत केवळ एक आरोप सिध्द झाला म्हणून काय करतील ते? काढून टाकतील?"[१३] या तिच्या उदगारातून येते. याठिकाणी तिचा निर्धारही दिसतो, "माझं आयुष्य हे माझं आहे. नोकरीसाठी विकलेलं नाही मी ते कुणाला..... माझ्या आयुष्याचं मी काय हवं ते करीन!"[१४] तसे पाहिलेतर नाटकातील इतर पात्रेही कुठेतरी, उणी आहेत, दुःखी आहेत. ही पात्रे आपल्या दुःखीपणाचा, उणेपणाचा बदला बेणारेवर घेवू इच्छितात. त्याचे कारण बेणारेचे दुःख विसरून दिलखुलास वागणे त्यांना नामंजूर आहे. त्यापात्रांच्या दृष्टीने सामाजिक गुन्हेगार असणा-या बेणारेने असे मुक्त स्वच्छंदी जगणे अयोग्य आहे. त्यातूनच एका अघोरी खेळाला सुरूवात होते. खरंतर, नाटक सुरु होण्यापूर्वी शिल्लक राहिलेला वेळ मजेत घालवावा व सामंतांना कोर्टाची

कल्पना द्यावी, हा साधा विचार असतो. त्यासाठी एका काल्पनिक खटल्याची कल्पना सुखात्मेंच्या डोक्यातून बाहेर पडते. त्यात **आरोपी म्हणून बेणारेंना** बरोबर गुंतविले जाते. आणि तिच्यावर इंडियन पिनल कोडच्या तीनशे दोन कलमाखाली **भ्रूणहत्येचा** जबरदस्त आरोप ठेवण्यात येतो. बेणारे या आरोपाने उभ्या जागी ताठरते, सुन्न होते. इथे नाटकाचा पहिला अंक संपतो.

दुस-या अंकाच्या प्रारंभी बेणारे, भ्रूणहत्येच्या आरोपाऐवजी सार्वजनिक मालमत्तेच्या अपहाराचा आरोप ठेवण्याची गळ घालते. परंतु वेळ जाण्यासाठी खेळला जाणारा हा खेळ असल्याने, हा आरोप वाईट नसल्याचे तिला सांगण्यात येते[१५] मनातून बिथरलेली, चरकलेली बेणारे अनिच्छेने सामोरी जाते. आरोपाचे गांभीर्य कमी व्हावे म्हणून कोर्टाच्या कामकाजात व्यत्यय आणते. समूहास असा रसभंग नको असतो. समुहातील प्रत्येकजण आपआपल्या परीने तिची सालटी काढण्याचा प्रयत्न करू लागतो. न्यायाधीश झालेल्या काशीकरांसमोर, सरकारी वकील झालेले सुखात्मे मातृत्वाची महती विशद करून भ्रूणहत्येचे महाभयंकर गांभीर्य निदर्शनास आणतात. पोंक्षे बेणारेची "**मास्तरीण काकू**"[१६] अशी टर उडवितात. "आरोपी विवाहित की अविवाहीत आहे ?" या प्रश्नाला "लौकिकदृष्टया तरी अविवाहित"[१७] असे खोचक उत्तर देतात. आरोपीने आपले लग्न जमविण्याचा प्रयत्न केल्याचे ते सांगतात. आरोपीच्या नैतिकतेविषयी प्रश्न विचारल्यावर "खटल्यातील की ख-या ?"[१८] असा प्रतिप्रश्न नवनाट्यवाले कर्णिक उभा करतात. रोकडे आपल्या साक्षीत प्रा. दामलेंच्या खोलीत बेणारे बसल्याचे सांगून, त्या रात्री दामलेंनी आपल्याला बाहेरच्या बाहेर कटविल्याचे सांगतात. काल्पनिक खटला जेव्हा बेणारेच्या खाजगी आयुष्याची चिरफाड करू लागतो तेव्हा बेणारे भेदरते, चिडते. तेव्हा पोंक्षे "**धिस इज जस्ट गेम । हा खेळ आहे**"[१९] अशी बेणारेची समजूत घालू लागतात तर दुस-या बाजूने सुखात्मे "**मजा येतेय**"[२०] असे प्रोत्साहन देतात.

प्रत्येक जण बेणारेला हा खेळ असल्याचे म्हणत असला तरी, प्रत्यक्षात तिच्या खाजगी आयुष्याचे जमेल तेवढे लचके तोडण्यात विकृत आनंद मानत असतात. प्रा. दामले काळे की गोरे माहित नसणारे भाबडयावृत्तीचे सामंतही, सूर्यकांत फातरफेकर यांच्या कादंबरीतील[२१] संभाषण वापरून साक्ष देतात. बेणारेची आत्मघात करण्याची धमकी, तसेच दोन जीवांच्या हत्येचे पाप तुम्हाला लागल्याशिवाय राहणारं नाही"[२२] असे बेणारे दामलेंना सांगत असल्याची खळबळजनक माहिती सामंत देतात. बेणारे त्वेषाने "**हे साफ खोटं**"[२३] असल्याचे सांगण्याचा प्रयत्न करते. समूहाचा डाव तिच्या लक्षात येतो. दाराची

कडी उघडत नसल्याने तिला समूहात, सापळ्यात अडकून राहावे लागते. सामंताचा अपवाद सोडला तर तिच्या मदतीसाठी कोणीही पुढे येत नाही. एका असहाय्य स्त्रीची शिकार करण्यासाठी निर्ढावलेली बाकीची माणसे क्रूरपणे व जबरदस्तीने तिला आरोपीच्या पिंज-यात ढकलतात. येथे दुसरा अंक संपतो.

तिस-या अंकामध्ये समूहाच्या हिंस्त्रवृत्तीचे वाढते प्रदर्शन घडते. सुखात्मे सहजपणाचा आव आणून जाणीवपूर्वक ब्रेणारेचा **"लीला दामले"**[२४] असा उपहासाने उल्लेख करतात. तिला वय विचारले जाते. तिचं **"लग्न का न व्हावं"**[२५] अशी शंका उपस्थित केली जाते. करता येईल तेवढी मानहानी करून समूह तिला ब्रेछूटपणे छळायला लागतो. वैतागून बाहेर जावू इच्छिणा-या बेणारेला सौ.काशीकर बळजबरीने आरोपीच्या पिंज-यात पुन्हा उभ्या करतात. ब्रेणारेचे प्रा.दामलेंच्या बाबतचे वागणे, अंधाराचा फायदा घेवून तिने रोकडेशी केलेला अतिप्रसंग अशी खळबळजनक माहिती सौ.काशीकर आपल्या साक्षीत देतात. तर रोकडे, आपण ब्रेणारेच्या थोबाडीत दिल्याची माहिती पुरवितो. पोंक्षे तर साक्षीसाठी उतावळे होऊन, एका हॉटेलमध्ये बेणारेंनी लग्नाविषयी केलेले संभाषण सांगतात. ब्रेणारेंनी इतरांचो काढलेली उणीदुणी समूहाला सांगतात." ब्रेणारे पर्समध्ये टिक्‌ट्‌वेंटी कशाला ठेवतात?"[२६] असा प्रश्नही उभा करतात. कर्णिक, आरोपीने आपल्या मामावर प्रेम केल्याचे, प्रेमात निराशा झाल्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा सांगून आरोपीचा भूतकाळ पापांनी बरबटलेला असल्याचे ठासून सांगतात.[२७] एका पाठोपाठ होणा-या आरोपांनी बेणारे आगतिक होते. त्यात भर म्हणून न्यायाधीश काशीकर, साक्षीदार होऊन मुंबईतील नामांकित पुढारी व शिक्षणमंडळाचे अध्यक्ष नानासाहेब शिंदे यांच्या घरी फोनवर ऐकलेल्या संवादाची माहिती पुरवितात, ती अशी की, "विवाहपूर्व गर्भधारणा म्हणजे अनिती. अशा बाईला अशा स्थितीत शिकवू देणे ही फारच अनिती. या बाईला कामावरून टाकण्याशिवाय दुसरा मार्ग नाही."[२८] ब्रेणारे हे सारे ऐकून गर्भगळीत होते. टिक्‌ट्‌वेंटीची बाटली तोंडाला लावण्याचा प्रयत्न करते.[२९] पण कर्णिक झटक्यात पुढे येऊन बाटली उडवितात.

काशीकरांच्या साक्षीनंतर तपासणी पूर्ण होते. आरोपीच्या वकीलांना, त्यांच्या बाजूने कोणी साक्षीदार असल्यास बोलविण्यास सांगण्यात येते. आरोपीच्या वकीलाची भूमिकाही सुखात्मे करीत असतात. ते प्रा.दामले,नानासाहेब शिंदे यांना साक्षीला बोलावितात. पण ते गैरहजर असतात. फिर्यादी पक्षाच्या साक्षीदारांची उलटतपासणी घेण्याची त्यांची मागणी नामंजूर केली जाते. सुखात्मेंना नाहीतरी आरोपीचा वकील होण्यात रस नसतोच..

मग ते पुन्हा सरकारी वकील होवून जोशात भाषण करतात. सामाजिक नैतिक मुल्यांना हरताळ फासणारं वर्तन मिस्.बेणारेंनी केल्याचे सांगून तिची "नंबर एकचा समाजशत्रू"[३०] अशा कठोर शब्दात निर्भित्सना करतात. "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति"[३१] हा मनुस्मृतीचा दाखला देवून आरोपीस कठोर सजा ठोठावण्याची विनंती करतात.त्यानंतर पुन्हा सुखात्मे निरूत्साहाने आरोपीचा वकील होवून भाषण करतात. आरोपीचा बचाव करण्यापेक्षा, तिच्या गुन्हयाचाच पुनरूच्चार करत, क्षमाशीलपणाने आरोपीच्या भयंकर गुन्हयाचा विचार करण्यात यावा असे सुचीवितात.

न्यायाधीश आरोपीला शिक्षा होण्यापूर्वी आपली बाजू मांडण्यासाठी दहा सेकंदाचा अवधी देवून तिची कूर थट्टा करतात. बेणारे मात्र पुरती कोलमडून पडली आहे. तिच्या मनातील खोल खळबळीचा अविष्कार तेंडुलकर दीर्घ स्वगतातून करतात. बेणारे जीवनावर मार्मिक भाष्य करते. वयाच्या चौदाव्या वर्षी आईच्या भावावर प्रेम केल्याचे सांगते.[३२] सुंदर जगणं वाटयास यावं म्हणून त्याच्याशी लग्नाचा हट्ट धरते. त्यास आईसह सर्वांचा विरोध होतो. मामाही ऐनवेळी शेपुट घालून पळून जातो. तेंव्हा आत्महत्येशिवाय दुसरा मार्ग नसल्याचे सांगते. यातून वाचल्यानंतर ती प्रौढपणे एका बुध्दिमान प्रा.दामलेंवर जीवापाड प्रेम करते. "मनानं केलेल्या भक्तीसाठी देहाचा नैवेद्य झाला आणि तेवढा घेवून माझा बुध्दिमान देव चालता झाला."[३३] या शब्दात प्रा.दामलेंचे कोठेही नाव न घेता, ती आपल्या प्रेमाची प्रतारणा झाल्याचे स्पष्ट करते. शरीराने घात केला असला तरी त्याच शरीरामुळे अतिशय सुंदर, खूप स्वर्गीय, तृप्त क्षण लाभल्याचे ती सांगते. त्या क्षणाचा साक्षी म्हणून एक कोवळा अंकूर जपण्यासाठी तिला शरीर हवे असते. त्या कोवळ्या जीवाला आई, हक्काचे वडील, घर, संरक्षण, प्रतिष्ठा हवी असते.

बेणारेनी मांडलेली कैफियत म्हणजे एका असहाय्य स्त्रीचे आक्रंदन आहे. हे आक्रंदन कोणालाच ऐकू येत नाही. तिला गर्भ नष्ट करण्याची शिक्षा फर्मावली जाते.[३४] तिला नोकरीवरून काढून पुण्यकर्म केल्याचे सांगितले जाते. प्रा.दामलेंच्या अनैतिक कृत्याचा साधा नामोल्लेखही केला जात नाही. "पुरूष प्रधान समाजव्यवस्थेत पुरूषाचा सुरक्षितपणा आणि हित हे स्त्रीच्या मूलभूत स्वातंत्र्याचा पध्दतशीरपणे संकोच करूनच प्राप्त करून घ्यावे लागते."[३५] हे डॉ. तारा भवाळकर यांचे विधान समर्पक आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

एकमेव सांमताला फक्त बेणारेविषयी सहानुभूती वाटते. तो **"हिरवाजर्द कापडी पोपट"**[२६] बेणारेच्या पुढयात ठेवून हळूच निघून जातो आणि रंगमंचावर बेणारेच्या आवाजातील सूर ऐकू येवू लागतात. **"चिमणीला मग पोपट बोले, का ग तुझे डोळे ओले ? काय सांगू बाबा तुला, माझा घरटा कोणी नेला"**[२७] या अर्थपूर्ण गीतानंतर रंगमंचावर अंधार केला जातो. फक्त बेणारेवर प्रकाश टाकला जातो आणि मग संथपणे पडदा पडतो.

"शांतता ! कोर्टचे" कथानक बेणारेभोवती फिरते. मुख्य कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी, शिल्लक राहिलेल्या वेळात अभिरूप न्यायालयाचा सामंताना परिचय करून द्यावा, हा मूळ हेतू बाजूला राहतो. कारण न्यायालयाशी सुसंगत भूमिका समूहाकडून पार पाडली जात नाही. प्रारंभी बेणारेवर ठेवलेला आरोप आणि अखेर तिला दिली जाणारी शिक्षा यामध्येही विसंगती आहे, याचे भान न्यायाधीशांना नसते. बेणारेवर भ्रूणहत्येचा आरोप ठेवला गेला आहे आणि **"गर्भ मरेपर्यंत नष्ट करण्याची"**[२८] शिक्षा तिला दिली जाते. एकतर भ्रूणहत्या म्हणजे, नुकतचं जन्मलेलं मुलं मारणे आणि न्यायाधीश तर तिला जन्माला येणारे मुलं मारायला सांगतात. खरेतर सारा समूहच "हा अभिरूप न्यायालयाचा काल्पनिक खटला आहे" हे विसरून गेलेला आहे. निकालात न दिसणारी सुसंगती न्यायालयाशी विसंगत आहे. पण त्याचे सोयरसुतक समूहाला नाही. ही विसंगती समूहाच्या कोत्या व पूर्वग्रहदुषित मनोवृत्तीची निदर्शक आहे. येथे खेळाप्रेक्षा **"स्त्री छळ"** महत्वाचा मानला गेल्याचे दिसते.

सभ्यपणाचा आव आणून एका शिक्षित परंतु परिस्थितीमुळे असहाय्य झालेल्या स्त्री ची विटंबना करण्यात गोडी मानणारा समूह आपल्या समाजव्यवस्थेचे दर्शन घडवितो. समाजाच्या जडणघडणीमध्ये स्त्रीचा वाटा मोठा असलातरी तिचे स्थान दुय्यम किंवा त्याहून खाली राहते. त्यातून स्त्रीकडून नीतिमत्तेच्या बाबतीत प्रमाद घडला असेल तर संधी गवसताच तिच्यावर मनमुराद प्रहार केले जातत. कारण पुरूषप्रधान समाजरचनेत केवळ स्त्री जातीवरच समाजाची नीतिमत्ता सांभाळण्याची जबाबदारी टाकण्यात येते. अनैतिक वागणारा पुरूष समाजामध्ये मोठया प्रतिष्ठेने जगू शकतो. परंतु स्त्रीची मात्र नाचक्की होते. तिला तोंड काढायलाही जागा उरत नाही. "शांतता ! कोर्ट" मध्ये बेणारेचे निषिध्द मातृत्व तिच्या शिक्षिकेच्या नोकरीवर गदा आणते, का तर ? भावी पिढयांवर अनैतिक संस्कार होवू नयेत ! परंतु प्रा. दामलेंचे अनैतिक पितृत्व उघड होवूनसुध्दा त्यांच्या प्रतिष्ठितपणाला बाधा येत नाही. समाजरचनेत जाणवणारी ही विसंगती प्रस्तुत

नाटकाच्या कथानकातून स्पष्ट होते.

"**एक असहाय्य स्त्री व तिची कुमारी मातृत्वाची समस्या**" केंद्रस्थानी मानून आकार घेत जाणारे, नाटकाचे कथानक अखेरीस समाजाच्या संकुचित, दांभिक, विकृत आणि हिंस्त्र प्रवृत्तीकडे लक्ष वेधते. यासाठी "शांतता कोर्ट !" नाटकातील स्त्री समस्येच्या चित्रणाचा सामाजिक व मानसशास्त्रीय अंगाने विचार करणे गरजेचे वाटते. प्रथम आपण सामाजिक दृष्टीने महत्व लक्षात घेवूया :

**××"शांतता ! कोर्ट चालू आहे"नाटकातील स्त्री समस्या चित्रणाचा सामाजिक अंगाने विचार××**

"शांतता ! कोर्ट चालू आहे" नाटकातील "**निषिध्द मातृत्वाची**" समस्या ही सनातनकाळापासूनची सामाजिक समस्या आहे. ही समस्या तेंडुलकरांनी मोठया अभिनव-पध्दतीने व कल्पकतेने मांडली आहे. त्यामुळेच या नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण अधिक प्रभावी व उठावदार झाले आहे. " एक श्रेष्ठ वाड्मयीन कलाकृती" म्हणून प्रस्तुत नाटकाचा व श्रेष्ठ नाटककार म्हणून तेंडुलकरांचा गौरव झाला आहे. श्रेष्ठ साहित्यकार हा स्वकालीन समाज व्यवस्थेतील गुंतागुंतीचे विश्लेषण करतो. त्याचे आंतरसंबध तपासून समस्या मागील सामाजिक घटितावर भाष्य करतो. त्याला सामाजिक वास्तवाच्या गतिमानतेचे भान असते. समाजाची सद्यस्थिती आणि बदलते सामाजिक वास्तव यांच्यातील व्दंव्दात्मक ताण त्याच्या मनात जागे होतात. "युगतत्वाचे भान ठेवणारीच कलाकृती श्रेष्ठ होते"[३९] असे नमूद करून डॉ.अंजली सोमण म्हणतात, साहित्यकृतीच्या वाङ्मयीन आशयाचे आकलन करून घेण्यासाठी सामाजिक संदर्भ महत्वाचे असतात. इतकेच नव्हे, तर स्वकालीन समाजाचे वास्तवाचे चित्रण व विश्लेषण लेखक कसे करतो यावर त्याच्या कलाकृतीची उंची ठरत असते"[४०] साहित्य आणि सामाजिक संदर्भ या बाबतीत डॉ.सोमण यांनी मांडलेले विचार प्रस्तुत अभ्यास विषयाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहेत.

साहित्य आणि सामाजिक परीस्थिती यांचे परस्परसंबंध असतात. अर्थात समाजाचा साहित्याशी असणारा संबंध, आरशात प्रतिबिंब पडावे तसा नसतो. कारण समाजातील घटना लेखक स्वकल्पकतेने, स्वप्रतिभेने व स्वविचाराने चित्रीत करीत असतो. या संदर्भात विद्याधर पुंडलीक रास्त भूमिका मांडतात, "साहित्याला एक व्यापक सामाजिक संदर्भ असतो. साहित्य आणि समाज हे परस्परावलंबी आहेत, परंतु समाजरचना आणि साहित्य

यांचे जैविक ≬Organic≬ किंवा गणिती स्वरूपाचे संबंध नसतात·" [४१] कोणत्याही कलाप्रकाराचा मागोवा घेताना पुंडलीक यांना पाच घटक महत्वाचे वाटतात· १≬ प्रतिभाशाली लेखकाचे व्यक्तित्व, मानवी अनुभवाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन आणि त्या प्रकाराचे रूप २≬ आपल्या सांस्कृतिक परंपरा ३≬ त्या त्या कला प्रकारातील प्रस्थापित झालेली अंतर्गत परंपरा ४≬ चालू घडीचे समाजजीवन आणि त्यावर होणारे आर्थिक, राजकीय, सामाजिक, शक्तींचे अघात. ५≬ पाश्चिमात्य संस्कृती आणि साहित्य यांचा प्रभाव· या पाच घटकापैकी, लेखकाचे व्यक्तित्व आणि त्याचा मानवी अनुभवाकडे बघण्याचा समग्र दृष्टिकोन हा घटक त्यांना अधिक अर्थपूर्ण वाटतो· लेखकाने मांडलेला मानवी अनुभव व त्या अनुभवाकडे बघण्याची दृष्टी, यांची मीमांसा समाजशास्त्रीय अंगाने करता येते· त्यादृष्टीनेच"शांतता ! कोर्ट चालू आहे" नाटकातील मानवी अनुभवाचा विचार करावयाचा आहे·

साहित्यनिर्मितीचा संबंध हा समाजव्यवस्थेशी, समाजातील घटनांशी असतो· साहित्यामध्ये अभिव्यक्त होणा-या घटना, प्रसंगाना जसे वैचारिक, भावनिक अंग असते तसेच सामाजिक-सांस्कृतिक अंग असते· साहित्यातून परस्पर विरोधी घटना, सामाजिक समस्या चित्रीत केलेल्या असतात· सामाजिक समीक्षेचा अवलंब करून त्या समस्येच्या चित्रणाचा चिकित्सक बुध्दीने शोध घेता येतो· मुळात सामाजिक समस्या ही व्यक्तीकडून सामाजिक संकेतांचे उल्लंघन झाले की निर्माण होत असते· समाज हा परंपरागत आचार विचार व रूढीप्रिय असतो· समाजाने स्वीकारलेली आचार संहिता मोडणारी व्यक्ती ही सामाजिकदृष्टया बंडखोर किंवा गुन्हेगार समजली जाते· मग ती आचारसंहिता व रूढी किती बुरसटलेली आहे, याची सारासार विवेकबुध्दीने चिकित्सा न करता ती जपण्यातच समाज धन्यता मानतो· नीतिकल्पनांचे संकेतही समाजाने ठरविलेले असतात· स्त्रियांच्यावर नीतिसंकेतांचे पालन करण्याची जबाबदारी अधिक टाकलेली असते· त्यांच्याकडून संकेतांचे उल्लंघन समाज मान्य करीत नाही· "शांतता ! कोर्ट चालू आहे" नाटकामध्ये जी स्त्री समस्या चित्रीत केलेली आहे, तिच्या निर्मितीचे कारणच मुळी "सामाजिक नीतिकल्पनांचे उल्लंघन" हे आहे· त्यामुळेच व्यक्ती विरूध्द समाज असा संघर्ष नाटकात उभा राहिलेला दिसतो·

"कुमारी मातृत्वाची" समस्या का निर्माण होते ? याचे साधे-सोपे उत्तर-विवाहपूर्व प्रणयातून कुमारी मातृत्वाची समस्या निर्माण होते असे देता येईल· पूर्वीच्या काळी बालविवाह रूढ असल्यामुळे अशी समस्या निर्माण होण्याची शक्यता नव्हती· आज कायद्यानुसार

विवाहाची वयोमर्यादा ठरली आहे. मुला-मुलांची शारीरिक वाढ झाली असलीतरी विशिष्ट वयापर्यंत विवाह करण्यास कायद्याने मज्जाव आहे. त्यामुळे प्रणयभावनेला अवसर मिळतो आणि त्याची परिणीती विवाहात होत नाही तेव्हा त्यातून कुमारी मातृत्वाची समस्या निर्माण होते. काही वेळा विवाहासाठी कायद्याने संमत केलेली वयाची अट मुलीने पूर्ण केलेली असते परंतु काही कारणाने विवाह लांबलेला असतो. अशा परिस्थितीत तिच्या सहवासात पुरूष येवून प्रणय घडला, तर त्याचा परिणाम म्हणून "कुमारी मातृत्वाची" समस्या निर्माण होते. (प्रस्तुत नाटकात बेणारेच्या बाबतीत ही समस्या घडते, त्याचे कारणही हेच आहे.) बलात्कारासारख्या आपत्तीतूनही कुमारी मातृत्वाची समस्या निर्माण होते. परंतु अशा स्त्री च्या समस्येकडे समाज थोडाफार सहानुभूतीने बघतो, तशी सहानुभूती इतर कुमारी मातांना लाभत नाही.

"मातृत्व" हे विवाहसंस्थेच्या चौकटीतच बसणारे असले पाहिजे अशी समाजाची धारणा असते. अन्यथा समाजाला ते पवित्र वाटत नाही. एखादी स्त्री पुरूषावर मनापासून प्रेम करते. आपले सर्वस्व दान करते. अशा प्रसंगी पुरूषाकडून तिचा विश्वासघात झाला तर ती फार व्यथित होते. परंतु त्याच्यापासून पदरी पडणारे मातृत्व तिला पवित्रच वाटते. बेणारेच्या स्वगत विचारात हीच भावना प्रतीत होताना दिसते. अर्थात ही तिची खाजगी भावना आहे. पण तिच्या खाजगी भावनेची विशाल, उदार अंतःकरणाने कदर करावी, अशी वृत्ती समाजाकडे नाही. परिस्थिती पूर्ण लक्षात न घेता तिची कुचेष्टा करण्यातच सारेजण पुढाकार घेतात. आपल्या खाजगी आयुष्यावर कोणी आघात करू नयेत अशी तिची आंतरिक अपेक्षा आहे. तशी ती असणेही स्वाभाविक आहे. याचे प्रत्यंतर आपणास "शांतता ! कोर्टच्या" प्रथम अंकाच्या प्रारंभीच येते. बेणारे म्हणते, "मी माझं काय करायचं ते हे कोण ठरविणार ? माझं आयुष्य हे माझं आहे. नोकरीसाठीं विकलेलं नाही मी ते कुणाला. माझी मर्जी ही माझी आहे. माझ्या आयुष्याचं मी काय हवे ते करीन"[४२] आपले खाजगी आयुष्य जपण्याच्या अपेक्षेने बेणारे एका परीने व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करते. परंतु व्यक्तिस्वातंत्र्याचा लाभ कोणत्या बाबतीत आणि कोणत्या मर्यादेपर्यंत घ्यावा याचे संकेत समाजाने ठरविलेले असतात. त्यातल्या त्यात स्त्रीबाबत तर हे संकेत काटेकोरपणे पाळले जातात. हे संकेत आपल्याकडून पाळले गेले नाहीत याची बोचणी वा अपराधिपणाची भावना बेणारेच्या मनाला सतावत असल्यामुळेच तिच्या तोंडून वरील उद्गार बाहेर पडतात. त्यामुळे **सामाजिक आयुष्य आणि खाजगी आयुष्य यामधील संघर्ष नाटकात उभा राहतो.** त्यानिमित्ताने व्यक्तीचे खाजगी आयुष्य व व्यक्तिस्वातंत्र्य

यांची चर्चा करणे आवश्यक वाटते.

समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे स्त्रिया शिकू लागल्या, कमवू लागल्या. या आधुनिक जगात त्या अर्थार्जनाच्या निमित्ताने स्वतंत्र झाल्या. परंतु हे स्वातंत्र्य दडपशाहीचे असते. ते सहन करीतच स्त्रियांना वावरावे लागते. त्यांच्या खाजगीपणावरही मर्यादा पडलेल्या दिसतात. त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्याही सीमा ठरलेल्या असतात. गो.पु.देशपांडे म्हणतात, "नवी संस्कृती दडपशाहीची ही कडू गोळी ब-याच साखरेत व मधात घोळवून आपल्याला देत असते व ह्या सहनशीलतेची स्वातंत्र्याशी आपण गफलत करीत असतो. कसोटीची वेळ आली की आपण आपले अहंमन्य काशीकर किंवा लाचार रोकडे होवून बसतो आणि बेणारेसारखीचा बळी जातो. तिला नकळतच ती बापडी स्तंभित होवून आपल्या मूल्यव्यवस्थेचा अर्थ लावत बसते व फसते." [४३]

समाजात पुढाकाराने वावरणा-या व्यक्तींचे खाजगी जीवन हा अनेकांच्या दृष्टीने कुतुहलाचा भाग असतो. मग तो नेता, अभिनेता वा शिक्षक असो. (बेणारेही याला अपवाद नाही) समाजात वावरताना त्यांना आपले खाजगी जीवन जास्त काळ दडवून ठेवता येत नाही. ते कोणत्यातरी निमित्ताने समाजाच्या लक्षात येते. बेणारेच्या बाबतीतही तेच म्हणता येईल. तिलाही आपले "खाजगी जीवन" जास्तकाळ दडविता आले नाही. अभिरुप न्यायालयाच्या निमित्ताने तिचे खाजगी जीवन चार चौघापुढे म्हणजे समाजापुढे येते आणि मग सामाजिक आयुष्य आणि खाजगी आयुष्य यांच्यातील संघर्षाला अधिक धार येते. गो.पु.देशपांडेच्या मते, "तेंडुलकरांनी खाजगी व सामाजिक आयुष्य ह्यांच्यामधला (बेणारेला न कळणारा) हा संघर्ष एकदम अर्थपूर्ण केला आहे." [४४]

मानव हा समूहप्रिय प्राणी आहे असे समाजशास्त्र सांगते. त्यामुळे व्यक्तीला जसे खाजगी आयुष्य असते तसेच सामाजिक आयुष्य असते. समाधानाने व प्रतिष्ठेने जगता यावे यासाठी सामाजिक आयुष्य जगत असताना ती व्यक्ती स्वतःचे खाजगी आयुष्य जपण्याचा प्रयत्न करते. आपल्या खाजगी आयुष्यावर कोणी अधिकार गाजवलेला त्या व्यक्तीला आवडत नाही. किंवा दुस-या बाजूने असे म्हणता येईल की, आपल्या खाजगी आयुष्यावर कोणी अधिकार गाजवावा हे त्या व्यक्तीने ठरविलेले असते. त्या व्यक्ती व्यतरिक्त जर कोणी अधिकार गाजवू लागला वा आघात करू लागला तर ती व्यक्ती प्रतिकार करते. मुळात व्यक्ती व त्याची शक्ती बघूनच समाज अधिकार गाजवतो. बेणारेच्या बाबतही नेमके असेच घडते. जेव्हा समाज तिच्या असहाय्यतेचा फायदा घेवून

तिच्या व्यक्तिगत जीवनावर मर्यादेपलिकडे अधिकार गाजवून हल्ला करतो, तेव्हा ती ही आपल्यापरीने प्रतिकार करते· तिने सुरक्षित ठेवलेल्या खाजगी आयुष्याला सुरूंग लावणा-या समाजाच्या विघातक, हिंस्त्र शक्तीविरूध्द ती एकाकीपणे लढत राहते· पण सामुदायिक हिंस्त्रतेपुढे तिचा प्रतिकार दुबळा ठरतो· बेणारेला म्हणजेच पर्यायाने एका असहाय्य स्त्री ला कोंडीत पकडून तिचा हसतखेळत मानसिक छळ करण्यात अघोरी आनंद मानणा-या क्रूर समाजप्रवृत्तीचे भेदक दर्शन "शांतता ! कोर्ट··· मध्ये घडते·

सामाजिक अंगाने या नाटकातील स्त्री समस्या चित्रणाकडे पाहिलेतर आपणास, असहाय्य स्त्रीकडे बघण्याची समाजाची दुषित प्रवृत्ती, देहसापेक्ष नैतिकतेला दिले जाणारे महत्व आणि रूढी परंपरेचे प्राबल्य या गोष्टींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो·

शांतता ! कोर्ट··· मध्ये चित्रीत झालेली स्त्री समस्या देहसापेक्ष चारित्र्याशी निगडीत आहे· चारित्र्यासंबंधी समाजाने ठरविलेल्या आचारसंहितेमध्ये पुरूषवर्गाला झुकते माप दिले गेल्याचे स्पष्ट जाणवते· या संदर्भात बेणारेचा मामा व प्रा·दामले यांचा निर्देश येथे करता येईल· "स्त्री-पुरूष समता" घटनेला अभिप्रेत आहे· पण घटना पुस्तकात बंदिस्त राहते आणि स्त्रीला त्या घटनेच्या हक्कापासून वंचित केले जाते· समाजाकडून नानाप्रकारची बंधने तिच्यावर लादली जातात·विवाहापूर्वी पित्याच्या, विवाहानंतर पतीच्या आणि पतीनंतर मुलांच्या बंधनात तिचे आयुष्य जखडले जाते· या बंधनातूनच अनेक प्रकारच्या स्त्री समस्यांचा जन्म होतो· स्त्री निराधार असेल आणि त्यात तिच्या हातून एखादा सामाजिक अपराध घडला असेल वा सामाजिकदृष्टया विसंगत कृत्य घडले असेल तर समाज तिचा हवातसा मानसिक, शारीरिक छळ करतो· असहाय्य बेणारेला तिच्या अनैतिक वागणुकीमुळे धारेवर धरले जाते· पण प्रा·दामले यांच्या अनैतिक वर्तनावर किंवा त्यांच्या विवाहबाहय संबंधावर चर्चा होत नाही· बेणारेच्या आत्महत्येच्या प्रयत्नावर चर्चा होते, परंतु तिच्या मामाच्या पलायनावर चर्चा होत नाही· खरेतर विवाहित असूनही प्रा·दामलेंनी एका अविवाहित स्त्रीच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेवून तिच्याशी शरीरसंबंध करणे ही कृती सामाजिकदृष्टया निंद्य आहे, पण त्याची गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता कोणालाही वाटत नाही·तिच गोष्ट बेणारेच्या मामाची·तो तर एका कोवळ्या मुलीच्या प्रेमाची प्रतारणा करतो·एका अजाण मुलीशी त्याने केलेली शारीरिक लगट ही सुध्दा अयोग्य बाब· परंतु

त्याची ही कृतीही विचारात घेतली जात नाही· म्हणजे पुरूषांच्या वासनाप्रवृत्तीवर प्रहार करण्यापेक्षा त्या वासनेला बळी पडलेल्या स्त्रीलाच समाज अधिक दोषी धरतो· प्रा·दामलेच्या- मुळे बेणारेच्या वाटयाला कुमारी मातृत्वाची समस्या आली· परंतु अनैतिकतेचा शिक्का फक्त बेणारेच्याच कपाळी बसतो· अनैतिक कृत्य करण्या-यापैकी केवळ बेणारेच समाजाच्या न्यायालयात आरोपी होते· कारण ती स्त्री आहे· स्त्रीच्या चारित्र्याबाबत समाजाने बाळगलेले संकेत तिने ओलांडले आहेत· गुन्हा एकटीच्या माथ्यावर मारून तिला आरोपीच्या पिंज-यात उभे केले जाते आणि अमानुष शिक्षा ठोठावली जाते· तिला एकटीलाच आरोपी करणे हे अन्यायाचे व असमतेचे आहे· अशावेळी सामाजिक समता व न्याय ही मूल्ये तुडविली जाताहेत याचे भान, न्यायालयाचा खेळ खेळणा-या मंडळींना नाही· हे स्पष्ट जाणवते·

समाज ही न्यायावर आधारित संस्था आहे· न्याय हा कायद्यावर आधारित आहे· परंतु कायद्याचा वापर व्यक्तिसापेक्ष केला जातो· त्यामुळे प्रत्यक्ष न्यायालयातही अन्याय होण्याची शक्यता असते· न्याय-अन्यायाचा खेळ खेळणा-या ज्या समाजाच्या न्यायालयात बेणारेचा खटला चालू आहे, तेथे कोणालाच न्याय-अन्यायाची चाड नाही· बेणारेला दिला जाणारा न्यायही आपण तिच्यावर ठेवलेल्या आरोपांशी विसंगत आहे· याचीही जाणीव त्या खटल्यातील न्यायाधीशांना नाही· आरोपीच्या चारित्र्याचे वाभाडे काढून आनंद लुटण्यातच त्यांच्यासह सर्वांना गोडी आहे· समाजहिताच्या नावाखाली अशी विकृत स्वरूपाची गोडी चाखण्यासाठी एका असहाय्य स्त्री चा वापर होणे ही बाब अन्यायाची आहे· अगदीच बेणारेचा दोष नाही असे नाही· परंतु तिच्या एकटीचाच दोष मात्र नक्कीच नाही· \बेणारेच्या कृतीचे समर्थन करण्याचा येथे हेतू नाही तर समाजाचा संकुचित दृष्टिकोन स्पष्ट करण्याचा हेतू आहे· पिढयानं पिढया समाजाने उराशी बाळगलेल्या नीतिकल्पनांशी बेणारे विसंगत वागली म्हणून तिला आरोपी करून शिक्षा· पण तिच्याशी विसंगत वागणा-या व्यक्तीला दिली जाणारी सवलत कोणत्या कायद्यात बसते ? त्यामुळे बेणारेला दिला जाणारा न्याय एकांगी नाही काय ? निषिध्द मातृत्वाची समस्या निर्माण व्हायला बेणारे व दामले हे दोघेही कारणीभूत असताना, प्रा·दामले यांच्या नोकरीवर गदा येत नाही परंतु बेणारेला मात्र नोकरीवरून काढून टाकल्याचे सांगण्यात येते हे अन्यायाचे नाही काय ? स्त्री ने स्वतःहून केलेल्या स्वैर आणि गैर वर्तनामुळे कुमारीमातृत्व निर्माण होत असेल तर दोष तिच्या एकटीचाच असे निश्चित म्हणता येईल पण ते

कुमारी मातृत्व पुरूषाने तिचा विश्वासघात निर्माण केल्यामुळे निर्माण होत असेल तर त्याबद्दल एकटया स्त्रीला दोषी धरणे अयोग्य व अन्यायाचे नाही काय ? या सा-या प्रश्नांची उत्तरे समाजाच्या रूढिग्रस्त समाज व्यवस्थेत व दांभिकवृत्तीत दडलेली दिसतात· यासाठी शांतता ! कोर्ट···· मधील पारंपरिक रूढिप्रिय समूहाचा व सामाजिक वातावरणाचा समाजशास्त्रीय दृष्टीने विचार केला पाहिजे·

सामुहिक मन नेहमीच परंपरावादी असते· समाजात चालत आलेली रूढी परंपरा जपण्यातच ते कृतार्थता मानते· शांतता!कोर्ट···मधील बेणारेच्या भोवतीची पात्रे म्हणजेच हा समाज ब्रेणारेशी निर्दयपणे वागला· याचे कारण रूढिग्रस्त समाजव्यवस्था· हे तर आहेच, याशिवाय हिंस्त्रप्रवृत्तीला पोषक असलेले वातावरण हे ही आहे· सामाजिक चौकट प्रमाण मानून, ज्या पध्दतीने ब्रेणारेवर अन्याय केला जातो, तिला नामोहरम केले जाते ती पध्दत रानटी आहे· ती पध्दत अवलंबणा-या समूहातील माणसे दांभिकवृत्तीची आहेत· सभ्यपणाच्या आवरणाखाली असभ्य कृत्य करणारी ही माणसे हिंस्त्र प्रवृत्तीची आहेत· "ही सारी खुजी, क्षुद्र, स्वत्व, कर्तृत्व गमावलेली, आपलं खरं स्वरूप झाकण्यासाठी नीतीचे, संस्कृतीचे मुखवटे धारण करणारी माणसे आणि यांच्या जगात कु·बेणारे जळत, पिचत का होईना पण स्वत्वाला जपत आपला गर्भ वाढवू पाहणारी· या खटल्यात ही सारी माणसे खरेपणानं, क्रूरपणे तिच्यावर तुटून पडतात· त्यांची ही लांडगेतोड जशी अमानुष आहे तशीच ती रानटीही आहे· विसाव्या शतकातील जणू ही रानटी माणसे आहेत·"[४५] समाजाच्या रूढिग्रस्त, दांभिक, हिंस्त्र प्रवृत्तीमुळे स्त्रीच्या वाटयाला येणा-या समस्येचे प्रभावी चित्रण "शांतता ! कोर्ट"·· मध्ये केले आहे·

सामाजिक मूल्यव्यवस्थेला ब्रेणारे कडून तडा जातो काय ? पावित्र्य, सौंदर्य, भक्ती यासारखी मूल्ये आपण जपल्याचे व विद्यार्थ्यांना शिकविल्याचे बेणारेचे मत आहे· प्रत्येक व्यक्तीला समाजामध्ये समाधानाने जगण्यासाठी कौटुंबिक व सामाजिक आधाराची गरज असते· हा आधारही सामाजिक मूल्यव्यवस्थेला अभिप्रेत असणारा असावा लागतो· बेणारे सुध्दा आधारासाठी प्रथम मामांशी व नंतर प्रा·दामलेशी संबंध ठेवते· परंतु तिच्या आयुष्यात आलेल्या या दोन्ही पुरूषाकडून तिला एकाच प्रकारचा आधार अपेक्षित नव्हता· "वयाच्या चौदाव्या वर्षी आपण मामावर प्रेम केले· लग्न करून सर्वांसारखं राजरोसपणे सुंदर जगणं जगता यावं"[४६] असे ती सांगते· म्हणजे मामावर तिने जे प्रेम केले· त्या प्रेमामध्ये तिला मानसिक, शारीरिक आधाराची अपेक्षा असते पण येथे तिची उपेक्षा होते·

त्यानंतर प्रौढपणी शिक्षिका झाल्यानंतर तिचा प्रा·दामलेंशी संबंध येतो· त्यांच्याकडून तिला केवळ मानसिक आधाराची गरज असते· आपलं मन समजावून घेईल अशा व्यक्तीची तिला गरज असते· म्हणून ती दामलेंवर प्रेम करीत नाही तर भक्ती करते· भक्तीचा संबंध हा मनाशी येतो· प्रा·दामले मात्र तिच्या मनाचा विचार करीत नाहीत· शरीराचाच विचार करतात याचे प्रत्यंतर आल्यानंतर ती खंत व्यक्त करते, "**मनानं केलेल्या भक्तीसाठी देहाचा नैवेद्य झाला आणि तेवढा घेवून माझा बुध्दिमान देव चालता झाला·** माझं मनं-भक्ती त्याला नकोच होती· तो देव नव्हताच तो माणूसच होता· ज्याच सार काही होत शरीरापुरतं· शरीरासाठी·"[४७] याचा अर्थच सामाजिक नीतिमूल्यांचा विचार न करता प्रा·दामले बेणारेच्या निराधारपणाचा गैरफायदा घेवून तिला आणखी निराधार करतात, दुःख देतात· अशाही परिस्थितीत बेणारे आपले दुःख खाजगी समजून मनात ठेवते व समाजात आनंदी-वृत्तीने राहण्याचा प्रयत्न करते· ती म्हणते, "हे विष मी पचवलं, पण त्याचा ओझरता भासही मी नाही त्यांना {विद्यार्थ्यांना} लागू दिला· मी त्यांना सौंदर्य शिकवलं, पावित्र्य शिकवलं· आतून रडत मी त्यांना हसवलं·"[४८] बेणारे हे जे सांगते त्याचा अर्थ स्पष्ट करताना गो·पु·देशपांडे म्हणतात, "बेणारे जगाला सांगते आहे की, अरे तुमची मूल्ये मी पुढे चालविली आहेत· तुमच्या सुरक्षित जगाला तडे जातील असे काही केले नाही· मग हा हल्ला काय म्हणून !"[४९] गो·पु·देशपांडेच्या मते, "बेणारेचा त्या मूल्यव्यवस्थेवरचा विश्वास अगदी प्रामाणिक व पक्का आहे· दामल्यांचा व तिच्या संबंधाचे वर्णन ती "हे प्रेम नव्हेच, ही भक्ती आहे··· मनाने केलेल्या भक्तीसाठी देहाचा नैवेद्य झाला" वगैरे शब्दात करते· "पावित्र्य, सौंदर्य, भक्ती, नैवेद्य" ह्या चार शब्दांची एक चौकट होते व ती बेणारेला अगदी जखडून टाकते· तिला कळत नाही की ही चौकट मान्य केल्यावरही तिच्यावर हा हल्ला का ?"[५०] परिस्थिती पूर्ण लक्षात घेवून "शांतता! कोर्ट··" मधील स्त्री समस्येच्या चित्रणाचा विचार केला तर "बेणारेवर हा हल्ला का ?" हा प्रश्न पडतो· परंतु त्याचे उत्तर रूढीपरंपरेत सापडते· समाजाकडून परिस्थिती पूर्णपणे समजावून घेतली जात नाही केवळ रूढी, परंपरा लक्षात घेतली जाते व त्या परंपरेत बसणारी देहसापेक्ष नैतिकता जपण्यात बेणारेला अपयश येते व तेच तिच्यावर हल्ला होण्यास कारणीभूत ठरते·

रूढीपरंपरेत बसणारी देहसापेक्ष नैतिकता बेणारेकडे नसल्यानेच पोंक्षे तिच्याशी लग्न करायला होकार देत नाहीत व तिच्याहून लहान असणारा रोकडेही तिच्याशी लग्न

करायला तयार होत नाही. एकतर दामलेंचा आधार तुटलेला आहे, अशा परिस्थितीत, आपल्या पोटी जन्माला येणा-या अपत्यावर समाजाकडून अन्याय होवू नये म्हणून ती पोंक्षे व नंतर रोकडेंना विवाहासाठी गळ घालते. तेथेही तिच्या पदरी निराशा येते. मग "तुमची बायको भजनी मंडळात असेल ?"[५१] असे विचारून सामंत कोठे गुंतला नाही; याची खात्री करून घेते. हे विचारण्यामागे तिचा हेतू कोणातरी पुरुषाचा आधार मिळवावा हाच असतो. वेल जशी आधाराने वाढते तसा तिला आधार हवा असतो. असा आधार गवसला तर आपल्याला समाजामध्ये थिराने वावरता येईल, हा तिचा आशावाद असतो. परंतु तिला आधाराहिन अवस्थेत राहावे लागल्याने समाजाकडून तिची उपेक्षा होते. तिच्यावर हल्ला होतो. आता प्रश्न असा उपस्थित होतो की, बेणारेला आधार असता तर तिच्यावर हल्ला झाला असता का ? बेणारेला जर आधार असता तर तिच्या परस्पर तिला कदाचित आरोपीही केले गेले नसते आणि आरोपी केले गेले असते तरी तिच्यावर भ्रूण हत्येचा आरोप ठेवला गेला नसता. हा आरोप ठेवण्याचे धाडस केले जाते, त्याचे कारण स्पष्ट आहे, ती असहाय्य स्त्री आहे. म्हणजे स्त्री ची असहाय्यता आणि समाजाची दडपशाही, हीच तिच्या समस्या निर्मितीस कारणीभूत होते . या रूढीपरंपरा प्रमाण मानल्यानेच कुमारी मातेला व्यभिचारी समजले जाते. डॉ. आशा परूळेकर म्हणतात, "कुमारी माता व्यभिचारी असे कलंक कपाळी नोंदले की समाजात या स्त्रीची किंमत शून्य ठरते. दोष कोणाचा आहे ? या पुढे या स्त्रीला काही मदत हवी आहे का ? हे जाणून घेण्याची तसदी कोणीच घेत नाही."[५२] बेणारेच्या बाबतीत जी कुमारीमातृत्वाची समस्या उद्भवते त्या संदर्भात दोष कोणाचा ? यावर गंभीरपणे चर्चा झाली असती तर अधिक योग्य झाले असते. तसेच तिला मदत हवी आहे का ? असे विचारले असते तर बेणारे ढासळत गेली नसती. पण असे विचारून सहाय्य करणे दूरच, तिला साधी सहानुभूतीही दाखविली जात नाही. "असहाय्य बेणारेवर क्रूरपणे हल्ला करून तिला घायाळ करणे" हेच शुभकार्य मानून कुलदैवताची प्रार्थना करणारे सुखात्मेसारखे दांभिक वकील, निराधार बेणारेला आधार देण्याऐवजी तिचा धिक्कार करणारे पोंक्षे, रोकडेसारखे साक्षीदार, स्त्री जातीने स्त्रीबद्दल सहानुभूती बाळगून तिची आस्थेने विचारपूस करण्याऐवजी पूर्ण परिस्थिती लक्षात न घेता बेणारेचा तिरस्कार व कुचेष्टा करण्यात पुढाकार घेण्या-या सौ. काशीकर ही सारी माणसे संकुचित व अमानुष वृत्तीचे दर्शन घडवितात. त्यातल्या त्यात सामंताला बेणारेविषयी सहानुभूती वाटते. पण त्याची सहानुभूती तिच्या जीवनाला कलाटणी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

देवू शकत नाही· त्यामुळेच समाजाच्या हिंस्त्र हल्ल्यापुढे बेणारे तग धरू शकत नाही· ती निपचित पडते· तिची शोकांतिका होते· सामाजिक अंगाने विचार केला तर ही शोकांतिका एकटया बेणारेची नाही तर असंख्य असहाय्य स्त्रियांची आहे· अशा स्त्रियांची दुःखे समजावून घेण्यासाठी जी सहानुभूती, उदार मानवतावादीवृत्ती व व्यापकदृष्टी लागते, त्याची समाजामध्ये उणीव असल्याने ही शोकांतिका निर्माण होते· यातूनच स्त्री आत्महत्येला प्रवृत्त होते· निषिध्द मातृत्वाच्या समस्येने ग्रासलेली स्त्री समाजाच्या अवहेलनेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी एकतर भ्रूणहत्या करते किंवा आत्महत्येस प्रवृत्त होते· बेणारे आपल्याजवळ जी टिक्‌ट्‌वेंटीची बाटली बाळगते त्याचे कारण हेच आहे· अखेरीस ती ही अशा लाजीरवाण्या जगण्याला वैतागून टिक्‌ट्‌वेंटीची बाटली हातात घेते· ती तोंडाला लावणार एवढयात कर्णिक झटक्यात पुढे होवून ती बाटली उडवितात आणि तेवढयापुरता एक संभाव्य अनर्थ टाळतो · याचा अर्थ हा अनर्थ पुढे घडणारच नाही असा नाही· अशा समस्याग्रस्त स्त्रियांची मनःस्थिती सहानुभूतीने समजावून घेतली नाहीतर असे अनर्थ घडत जाणार· बेणारेला तिची कैफियत मांडण्यासाठी दहा सेकंद देण्यात येतात· म्हणजे तिचे काही ऐकून घ्यावे अशी ही कोणाची इच्छा नाही· वास्तव जीवनातही असेच घडते· अशा समस्याग्रस्त स्त्रियांची कैफियत ऐकून घेतली जात नाही· तिला गुन्हेगार समजून अमानुष छळ केला जातो, कठोर शिक्षा दिली जाते·कु·बेणारेच्या समस्येच्या चित्रणातून हेच तेंडुलकरांनी प्रभावीपणे सांगितले आहे·

प्रारंभी गमतीदारपणे सुरू झालेले "शांतता ! कोर्ट··" गंभीर वळणाने पुढे सरकते· अखेरीस समाजातील हिंस्त्रप्रवृत्तीचे दर्शन घडवून मनं सुन्न करते व आपल्याला अंतर्मुख व्हायला लावते· तेंडुलकरांनी "शांतता ! कोर्ट···" मध्ये वास्तव समाजव्यवस्थेचे व कुमारी मातृत्वाच्या समस्येचे मार्मिक व भावस्पर्शी चित्रण केले आहे·

**×"शांतता ! कोर्ट चालू आहे"नाटकातील स्त्री समस्या चित्रणाचा मानसशास्त्रीय अंगाने विचार×**

"शांतता ! कोर्ट चालू आहे" नाटकातील स्त्री समस्या चित्रणाची मानसशास्त्रीय पातळीवर चिकित्सा करण्यासाठी नाटकातील व्यक्तिचित्रांच्या मनोभूमीचा विचार करणे आवश्यक आहे· नाटकातील व्यक्तिरेखा या समाजातील व्यक्तीचे प्रतिनिधित्व करीत असतात· नाटकातील घटना-प्रसंग, संवादातून मानवी मनाचे दर्शन घडते· या मानवी

मनाचा शोध आपणास मानसशास्त्रीय पध्दतीने घेता येतो. सिंगमन फ्राईड या मानसशास्त्रज्ञाने मानवी मनाचे तीन स्तर सांगितले आहेत. ते म्हणजे जागृत मन, अर्ध जागृत मन, व सुप्त मन. जागृत मन म्हणजेच जाणीवेच्या पातळीवरील वर्तन. मानवाचे हे वर्तन आपल्या परिचयाचे असते. थोडया परिश्रमाने आपण मानवाच्या अर्धजागृत मनातील विचार ही जाणून घेवू शकतो. परंतु मानवाचे सुप्त मन किंवा नेणीवेचा स्तर मात्र आपणास पूर्णपणे अज्ञात असतो. या स्तरामध्ये त्याच्या आशा-आकांक्षा दडलेल्या असतात. व्यक्तीला आलेले अनुभवही सुप्त मनात साठविले जातात. नाटककार हा आपल्या सुप्त मनातील अनुभव, भाव भावना, नाट्यकृतीव्दारे अविष्कृत करीत असतो. या संदर्भात डॉ.मोहन आगाशे व डॉ.विद्याधर वाटवे असे मत मांडतात की, "नाटककार त्याला भिडलेल्या अनुभवातील, संघर्षातील नाट्य शेवटपर्यंत टिकवून ठेवतो. सुप्त मनातील संघर्ष, त्यांना शेवटपर्यंत पूर्ण जाणीवेचं स्वरूप न देता नाटककार क्रमाक्रमानं आणि हळुवारपणे त्यानं निर्मिलेल्या पात्रामधून उलगडत नेतो. या प्रक्रियेमध्ये प्रेक्षकांना गुंतवून त्यांना या पात्राशी समरस करतो. हे करत असताना त्यात या व्यक्तिरेखेची अभिव्यक्ती ज्याला मानवी तर्कशास्त्र म्हणता येईल, अशा तर्कबुध्दीने केलेली असते."[५३]

नाटकामध्ये व्यक्तिमनांच्या गुंतागुंतीचे चित्रण आलेले असते. ही व्यक्तिमनाची गुंतागुंत उलगडण्यास मानसशास्त्रीय समीक्षा पध्दतीचा अवलंब अधिक उपयुक्त ठरतो. एखाद्या विशिष्ट प्रकारचे मानवीवर्तन का घडले ? ते तसेच का घडले ? याचा शोध आपणास मनोविश्लेषणाव्दारे घेता येतो. डॉ.राजेंद्र बर्वे यांच्या मते," मनोविश्लेषणशास्त्र आणि साहित्य यांचा अगदी जवळचा दृढ आणि अर्थपूर्ण संबंध आहे. मनोविश्लेषणातील अत्यंत महत्वाच्या पायाभूत तत्वाची व्युत्पत्ती साहित्यातून झालेली आहे. विशेषतः नाट्यकृतीचा आणि मनोविश्लेषणाचा फार जवळचा संबंध आहे."[५४]

मानसशास्त्रीय अंगाने "शांतता! कोर्ट चालू आहे" नाटकातील व्यक्तिचित्रांच्या मनोभूमीचा विचार आपण करणार आहोत, तसाच त्या नाटकातील घटना आणि पात्रांचे परस्पर संबंधाचा, नाटकातील प्रतीकांचा, प्रतिमांचाही विचार करणार आहोत. "मानसशास्त्रीय समीक्षेची उपाययोजना करण्याबाबत विजय तेंडुलकर यांची "शांतता! कोर्ट चालू आहे" ही नाट्यकृती फार योग्य दिसते. कदाचित या नाटकासाठी कल्पलेला व्यूह, त्याची रूपसिध्दी आणि त्या दोहोतील युक्त लवचिकपणा यामुळे जागृत मनाचे पहारे चुकविणे आणि वर येवून कार्यकारी होणे, नेणीवेच्या गुहेतील अज्ञात सूत्रांना शक्य झाले असावे"[५५]

असे मत अरविंद वामन कुलकर्णी यांनी मांडले आहे.

मानसशास्त्रीय समीक्षा पध्दतीचा उपयोग करून घेता येईल अशा काही घटना प्रस्तुत नाटकात आढळतात. त्यादृष्टीने नाटकाच्या प्रारंभीची नेपथ्य व प्रकाश योजना विचारात घेता येईल. नाटकाच्या प्रारंभी "प्रकाश उजळतो" असे म्हटले आहे. म्हणजे त्यापूर्वी रंगभूमीवर सर्वत्र अंधार आहे. प्रकाश उजळल्यानंतर रंगभूमीवरील ओक्या बोक्या दालनाचे दर्शन घडते. या दालनात बाहेरून यायचा व आतल्या खोलीत जायचा असे दोन दरवाजे आहेत. दालनात एक व्यासपीठ, एकदोन जुनाट लाकडी खुर्च्या, एक खोके, एक स्टूल असे काहीबाही अडगळीसारखे पडलेले आहे. भिंतीवर एक बंद घड्याळ, पुढा-यांच्या जुनाट तसबिरी, देणगीदारांची नावे असलेला लाकडी फलक आहे. दारावर गणपतीचे चित्र लावलेले आहे. दार बंद आहे. प्रकाश उजळल्यानंतर हे जे दालनाचे दर्शन घडते, ते नेणीवेतून जागृतमनाचे दर्शन घडत जावे तसे आहे. प्रस्तुत नाटकात व्यक्तिचित्रांच्या मनोभूमीचे दर्शनही याच पध्दतीने घडत जाते. अगदी सुरूवातीला त्या पात्रांच्या वर्तनाचा उलगडा होत नाही. परंतु त्यांच्या मनाचे अंधार कोपरे जसे प्रकाशत जातात तसे त्यांच्या वर्तनामागील हेतू लक्षात येत जातात. बेणारेचे वागणे-बोलणे अल्लड-पणाचे व अवखळपणाचे आहे. पण हळूहळू आपलं दुःख, आपल्या व्यथा दाबण्यासाठी ती चढवीत असलेला हा एक मुखवटा आहे हे आपल्या लक्षात येत जाते. आता प्रश्न असा उभा राहतो की, ती मुखवटा धारण का करते ? या प्रश्नाचे उत्तर नाटकातील घटना प्रसंगातून स्पष्ट होत जाते. त्यापैकी एक, तिला मूल्यव्यवस्थेला तडा जावू द्यायचा नव्हता. हे समाजशास्त्रीय पातळीवरचे उत्तर झाले. मानसशास्त्रीय पातळीवर उत्तर द्यायचे झालेतर असे म्हणता येईल की, तिच्या नेणीवेच्या स्तराकडे कोणाचे लक्ष वेधले जावू नये म्हणून ती जागृत स्तरावर असा मुखवटा धारण करीत असेल. तिच्या नेणीवेचा स्तर जेव्हा ज्ञात होतो तेव्हा तिच्या वर्तनामागचे हेतू लक्षात येत जातात. सामंताशी ती जवळीक साधण्याचा प्रयत्न करते. "तुमची बायको आहे वाटतं भजनी मंडळात ?"[५६] अशी आजूबाजूला कोणी नसताना सहजपणे चौकशी करते. परंतु बेणारेच्या मनाची गुंतागुंत उकलल्यानंतर तिने सहजपणे केलेली चौकशी मोठी हेतूपूर्वक असल्याचे लक्षात येते. "सामंत अविवाहित असल्याची खात्री" करून घेण्यासाठीच ही चौकशी असते. आपल्या व्यक्तिगत जीवनात आधार मिळविण्यासाठी, सुप्तमनातील हेतूपूर्तीसाठी तिने चालविलेला शोध म्हणजेच ही चौकशी असते. ती सामंताशी जी लगट करण्याचा प्रयत्न करते, त्यामध्ये तिची कामप्रेरणा

दिसते. एकतर ती प्रारंभी "बोट ओठात" धरून उभी राहते ही कृतीही कामप्रेरित. "तुमच्या बरोबर कुठंतरी लांब जात राहावं","तुम्ही मला आवडलात"[५७] हे ब्रेणारेचे उद्‌गार, "जादू जवळून पाहिलीत तुम्ही" असे म्हणून तिने सामंताशी केलेली शारीरिक लगट, हे कामेच्छेशी संबंधित वाटते. सामंताच्या हातात असलेली "कुलुप-किल्ली" त्याचेच प्रतीक आहे. तसेच दरवाजा बंद करणा-या कडी कोयंड्याचा सामंताने केलेला उल्लेखही कामव्यवहाराशी संबंधित आहे.

घरच्या शिस्तीमुळे व शिक्षिकीपेशामुळे ब्रेणारेवर बंधने आलेली असतात. त्यामुळे तिच्या कामेच्छा दडपल्या गेलेल्या असतात, त्यात ती तरुण असल्याने आपल्या कामेच्छा तृप्त करण्यासाठी संधी शोधत असते. तिची पुरुषाच्या सहवासाची ओढ प्रकट व्हावी असे प्रसंग नाटकात आढळतात. वयाच्या चौदाव्या-पंधराव्या वर्षीच ती मामावर प्रेम करते. "माझ्या उमलत्या शरीराच्या बहरात तोच माझ्या जवळ आला"[५८] असे ती म्हणते. मामाच्या पलायनवादी वृत्तीनंतर "माझा पुरुष शेपूट घालून पळाला" अशी कडवट प्रतिक्रिया व्यक्त करते. ब्रेणारेच्या वरील उद्‌गारातून लैंगिकवृत्तीचा बोध होतो. त्यानंतर ब्रेणारेचा प्रा. दामलेंशी शरीरसंबंध येतो. ते ही तिच्यापासून बाजूला होतात. मग ती पोंक्षे,रोकडे यांच्यांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करते. पण येथे तिच्या पदरी निराशा येते. तिची कामेच्छा दडपली जाते. त्यामुळे पहिल्या भेटीतच ती सामंताशी लगट करून तो कोठे गुंतला नाही ना याची खात्री करून घेते. त्यामुळे सुरुवातीला सामंताच्या बाबतीतील तिचे वर्तन कामप्रेरणेचे प्रतीक आहे. अरविंद वामन कुलकर्णी म्हणतात, "सामंताच्या मनोभूमीवर केंद्रस्थानी असणारी ब्रेणारे ही व्यक्तिरेखा कामप्रेरणेचे प्रतीक आहे. पुरुषांच्या सहवासाची तिची ओढ जी नाटकात चर्चिली जाते ती या प्रेरणेचेच फलित होय."[५९] हव्या असलेल्या व्यक्तिकडून लैंगिक समाधान मिळविण्यात ब्रेणारेला यश तर मिळत नाहीच पण अपमानित व्हावे लागते. त्यामुळे तिचा अहं दुखाविला जातो. नेणीव स्तरातील हे दुःख लपविण्यासाठी, विसरण्यासाठी ती शाळेचा, विद्यार्थ्यांचा उल्लेख करते. "तिला आठवणारी तिची शाळा, त्यातील विद्यार्थी, तिचं तन्मय होऊन शिकवण, तिची जरब, तिची शिक्षकी पेशातील निष्ठा याबद्दल तिच्या तोंडून सतत बाहेर पडणा-या निकराच्या उक्ती म्हणजे तिच्या या अतृप्त कामेच्छेने शोधलेला उदात्त आश्रय आहे. कार्यकारी झालेल्या तिच्या अत्यहंचे हे क्षेत्र आहे. तिचे आत्महत्येचे प्रयत्न सुध्दा कामेच्छेच्या अतृप्तीतून संभवलेल्या पण कार्यकारी अत्यहंची जोड मिळालेल्या अवस्थेतील आत्मान्‌काराच्याच कृती होत"[६०] असे प्रतिपादन

श्री· कुलकर्णी करतात·

बेणारेच्या अतृप्त-तृप्त कामेच्छांचा उलगडा होण्याच्या दृष्टीने नाटकाच्या अखेरीस असलेले तिचे स्वगत अधिक उपयुक्त ठरते· स्वगताव्दारे तिच्या सुप्तमनात दडलेल्या व दडपल्या गेलेल्या भाव-भावनांचा बोध होतो· आपल्या जगण्यावर भाष्य करताना ती म्हणते, "हुकलेल्या आत्महत्येतला आनंद फार मोठा असतो· जगण्यातल्या वेदनेहून मोठा·"[६१] मामाकडून आपल्या बहरलेल्या शरीराची वाखाणणी होत असल्याचे ती सांगते· हे तिचे सांगणे तिच्या मनात दडलेल्या कामेच्छांचे प्रतीक आहे· मामाचे पलायन हे तिच्या दृष्टीने अतृप्त राहिलेल्या कामेच्छांचे प्रतीक आहे· या अतृप्तीतूनच ती आत्महत्या करायला प्रवृत्त होते· आत्महत्या हुकल्यानंतर तिच्या वाटयाला आनंद येतो· हा आनंद कोणता ? जो आनंद तिला जगण्यातल्या वेदनेहून मोठा वाटतो। पुढे असा प्रश्न येतो, ही वेदना कोणती ? ज्या वेदनेपेक्षा तो आनंद मोठा वाटतो। प्रा·दामले देहाचा नैवेद्य घेवून पळाले ही वेदना· परंतु त्यांनी तिला तृप्तीचे क्षण दिले हा आनंद· आत्महत्या हुकल्यामुळेच तिला हा आनंद प्राप्त होतो· शरीराने घात केला असलातरी त्या शरीरामुळेच तृप्तीचे क्षण वाटयाला आल्याचे ती सांगते· एका बाजूला ती आपल्या शरीराची किळस व्यक्त करते तर दुस-या बाजूला " त्यानंच जळत तुला एक अतिशय सुंदर, खूप स्वर्गीय तृप्त क्षण दिला होता" अशी त्याच शरीराबद्दल कृतज्ञता व्यक्त करते· "त्या क्षणाचा साक्षी - एक कोवळा कोवळा अंकूर"[६२] असे म्हणून तो गर्भ जपण्याचा निर्धार व्यक्त करते· हा गर्भ म्हणजेच तिची कामेच्छा तृप्ती आहे· स्वगतातून बेणारेच्या नेणीवस्तराचे दर्शन घडते व त्या व्दारेच आपणास तिच्या अतृप्त-तृप्त कामेच्छेचा उलगडा होतो· प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्या ही बेणारेच्या तृप्त कामेच्छेतून जन्माला आली· तिची तृप्त कामेच्छा ही, श्री व सौ·काशीकरांच्या अंतर्गत मत्सराची बाब होती·

प्रस्तुत नाटकात अशाही काही घटना घडतात की त्यांचा बोध मानसशास्त्रीय अंगाने होवू शकतो· उदा·बेणारेने रोकडेला थोबाडीत देणे· सौ·काशीकरांनी रोकडेला साक्ष देण्यासाठी प्रोत्साहन देणे इ· मानवामध्ये अहंगंड, न्यूनगंड आणि सहजप्रेरणा असतात· पोंक्षे विवाहासाठी बेणारेला होकार देत नाहीत· त्यानंतर रोकडेसारखा सामान्य, बेणारेच्या मते, श्री व सौ· काशीकरांनी पाळलेला लाचार मुलगाही तिला नकार देतो, म्हटल्यावर ती त्याच्या थोबाडीत देते· ही कृती तिच्या अहंगंडातून निर्माण होते· अहंगंड दुखावल्यामुळे तिच्या मनात इतराबद्दल अनादराची, तुच्छतेची भावना निर्माण

होते· त्याच्या उलट,,बेणारेबद्दल इतरांच्या मनात मत्सराची भावना निर्माण होते· त्याचे मानसशास्त्रीय कारण समजावून घेतले पाहिजे· मानवामध्ये अहंगंड असतो तसा न्यूनगंडही असतो· "शांतता। कोर्ट "मधील पात्रे ही न्यूनगंडाने ग्रासलेली दिसतात· त्यामुळे ती पात्रे बेणारेला अपमानित करण्याची संधी सोडत नाहीत· सौ·काशीकरांचे बेणारेला खस्सकन ओढून आरोपीच्या पिंज-यात ढकलणे किंवा" न्यायाधीश" काशीकरांचे "साक्षीदार" काशीकर होणे, हे न्यूनगंडापोटीच घडते· काशीकर दांपत्य हे अपत्यहीन आहे· बेणारेला राहिलेल्या गर्भामुळे त्यांना आपल्या आयुष्यातील अपुर्णतेची जाणीव होत जाते· ही जाणीव म्हणजे बेणारेबद्दल वाटणारा हेवा आहे म्हणजे न्यूनगंडामुळे हा हेवा निर्माण होतो· सौ·काशीकरांचा रोकडेशी संबंध असल्याचा संशय काशीकरांच्या मनात असतो· हा संशय त्यांना स्वतःच्या लैंगिक असमर्थतेतून निर्माण झाला असावा· हा संशय बेणारेने व्यक्त केल्याचे पोंक्षे सांगतात· तेव्हा सौ·काशीकरही बेणारेकडे खावू की गिळू अशा पाहतात· यातून सौ·काशीकरांच्या मनोभूमीचाही बोध होतो· "शांतता।कोर्ट" मधील पात्रांचे मनोविश्लेषण करता, ती पात्रे कुठेतरी अपूर्ण आहेत, हे जाणवत राहते· सुखात्मे वकील आहेत पण त्यांच्याकडे कोर्टात अडलेला अशीलसुध्दा जात नाही· त्यांना बाररूममध्ये, बि-हाडात एकटयालाच माशा मारत बसावे लागते म्हणजे ते अपेशी वकील आहेत· पोंक्षे इंटरफेल आहेत· म्हणजे ते अपेशी विद्यार्थी आहेत. त्यांचा उल्लेख बेणारे, "इंटरसायन्सला आमच्या शास्त्रज्ञांनी वन्समोअर घेतलाय आणि सध्या तो सी·टी·ओ·त क्लार्क आहे"[६३] असा उपहासाने करते· म्हणजे एकुण ही पात्रे जीवनात अपेशी आहेत· त्यामुळे ती अंतर्गत दुःखी आहेत· आपली न्यूनता भरून काढण्यासाठी त्यांनी विविध तडजोडी करूनही त्यांना समाधान मिळवलेले नसते· श्री व सौ·काशीकरांना रोकडेला सांभाळूनही अपत्य सुख मिळालेले नसते· सुखात्मे अभिरूप न्यायालयात वकिलाचे काम करूनही सुखात्मे असमाधानी असतात· पोंक्षे यांनां अभिरूप न्यायालयात शास्त्रज्ञाची भूमिका मिळूनही ते व्यथित असतात· प्रत्यक्ष जीवनात आपल्याला हवं ते मिळालं नाही याची टोचणी त्यांच्या अंतर्मनाला होत असावी त्यामुळे मुलपाळून, वकीलाचे, शास्त्रज्ञांचे काम करूनही यांच दुःख, अपेश कमी झालेले नसते· या पार्श्वभूमीवर बेणारेच्या मनोभूमीचा विचार केलातर आपणास बेणारेही दुःखी व अपेशी दिसते· परंतु इतर पात्रांच्यात व तिच्या दुःखात एक फरक आहे· तिला हवा तो साथीदार मिळत नसल्यामुळे ती दुःखी आहे; तरी ती हसतमुख आहे· शिक्षिकी पेशामध्ये

आनंद मानून ती आपले दुःख भरून काढीत असते. त्यामुळे ती इतर पात्रांसारखी दुःखी नसते. ती हसत असते, गात असते, मनमोकळी वागत असते. आपल्यासारखीच बेणारे दुःखी असूनही अशी वागते याचा हेवा इतर पात्रांना वाटतो. तिचे हे वागणे त्यांना सहन होत नाही. बेणारेचा त्यांच्याकडून मानसिक छळ होतो त्याचे कारणच बेणारेबद्दल त्यांना वाटणारा हेवा हे आहे. या पात्रांचे मनोविश्लेषण करताना द.भि.कुलकर्णी म्हणतात, "आपल्या प्रमाणेच ही {बेणारे} देखील पराभूत अधुरी असून ही सुखी कशी ? या प्रतिक्रियेने माणसे पछाडली जातात. त्यांचा पराभवाचा, उणिवेचा आणि दुःखाचा त्यांना अपमान वाटतो"[६४] म्हणजे ही पात्रे आपल्या अपमानाचा बदला बेणारेला छळून घेतात व त्यात अघोरी आनंद मानतात. न्यूनगंडामुळेच इतर पात्रांची हिंस्त्र प्रवृत्ती प्रगट होते.

नेणीव स्तराला धक्का न लावता जोपर्यंत पात्रांचे जागृत स्तरावरील दर्शन घडत असते तोपर्यंत **"एक गंमतीदार खेळ"** असे नाटकाचे स्वरूप असते. परंतु त्यांच्या नेणीवेतील स्तर उफाळून जाणीवेच्या पातळीवर प्रकट होवू लागतात तेव्हा हे नाटक गंभीर स्वरूपाचे वळण घेत जाते. व्यक्तिगत जीवनातील अपयशानेच माणसे न्यूनगंडप्रेरित होतात.
**"शांतता! कोर्ट"** मधील पात्रे न्युनगंडप्रेरित आहेत. बेणारेची आनंदीवृत्ती ते आपला अपमान समजतात. प्रा.दामलेसुध्दा त्यांच्यादृष्टीने असूयेचा विषय आहे. दामलेंनी बेणारेशी संबंध ठेवून शरीरसुख घेतले व नंतर तिला झिडकारून टाकले म्हणजे लैंगिक सुख घेवून तिच्यात गुंतून न राहण्याची दामलेची प्रवृत्ती इतर पात्रांच्या वांछेचे आणि अपूर्णतेचे प्रतीक आहे. अरविंद वामन कुलकर्णी म्हणतात, "कामेच्छेची अतृप्ती आणि न्यूनगंडाची टोचणी यांच्या दडपणामुळे त्रस्त झालेल्या नेणीवेतून या सर्व व्यक्तिमनांच्या ठिकाणी होतो तो पाशवी हिंस्त्रतेच्या सहजप्रवृत्तीचा अविष्कार. तो ही जिच्या अस्तित्वामुळे अतृप्ती आणि टोचणी यांचा प्रादुर्भाव त्यांच्या ठिकाणी होतो. त्या वस्तूच्या म्हणजे बेणारेच्या रोखाने. काशीकर दांपत्य, सुखात्मे, पोंक्षे, कर्णिक, रोकडे अशी आपापल्या जीवनक्षेत्रातील अयशस्वी, न्यूनगंडप्रेरित माणसे बेणारेचे अगदी लचके तोडतात"[६५]. यापैकी काशीकर आणि सुखात्मे यांच्या मनोभूमीचा विचार करूया. कारण न्यायालयीन कामकाजामध्ये न्यायाधीश, वकील व आरोपी यांना महत्व असते.

"**शांतता!** कोर्टमधील सुखात्मे अभिरूप न्यायालयाच्या कार्यक्रमात दुहेरी भूमिका बजावत असतात. एक सरकारी वकील व दुसरी आरोपीचे वकील. ते दोन्ही भूमिकांना समान न्याय देतात का? तसेच न्यायाधीश झालेले काशीकर आपल्या भूमिकेशी प्रामाणिक राहतात का? या प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच द्यावी लागतात. प्रस्तुत नाटकातील दोन घटनांची तुलना करून त्यांचा भूमिका बजावण्यातील अप्रामाणिकपणा सिध्द करता येतो. या घटना वेळेच्या संदर्भात आहेत. एक - पानाची पिंक थुंकण्यासाठी खर्च करावा लागणारा व खर्च केलेला वेळ, आणि दोन - बेणारेला आपली बाजू मांडण्यासाठी दिला गेलेला वेळ. न्यायाधीशांनी आरोपीला आपली बाजू मांडण्यासाठी दहासेकंदाचा वेळ दिला आहे. पानाची पिंक थुंकण्याला सुध्दा दहासेकंदापेक्षा अधिक वेळ लागतो. हे सरकारी वकील प्रात्यक्षिकासह सिध्द करतात आणि हे सिध्द करण्यासाठी न्यायाधीशसुध्दा परवानगी देतात व "**पानाची पिंक थुंकण्याविषयीच्या प्रात्यक्षिकात आणि चर्चेत कोर्टात अध्यामिनटाहून अधिक वेळ गेल्याचे सांगतात.**"[६६] म्हणजे पानाची पिंक थुंकण्यासाठी जेवढा वेळ खर्च केला जातो. त्यापेक्षा कमीवेळ बेणारेला आपली बाजू मांडण्यासाठी देण्यात येतो आणि विशेष म्हणजे आरोपीला दिलेल्या अल्प वेळेबद्दल आरोपीचे वकील यत्किंचितही विरोध दर्शवित नाहीत. याच आरोपीच्या वकीलांनी, "सरकारी वकिलांनी पानाची पिंक थुंकण्यात यावी म्हणून पाव मिनीटाची रजा मागितली" म्हणून विरोध दर्शवून या कामाला दहासेकंद पुरेसे असल्याचे म्हटले होते.[६७] यातील "विरोध दर्शविणे" ही कृती विचारात घ्यावयाची आहे. वेळेच्या संदर्भात ,"पानाची पिंक" सारख्या किरकोळ गोष्टीवर आपली बौध्दिक ताकद खर्च करणा-या आरोपीच्या वकीलांना, बेणारेला बाजू मांडण्यासाठी दिलेल्या वेळेबाबत आपली बौध्दिक ताकद खर्च करावी वाटत नाही. सुखात्मेंच्या मनोभूमिकेचा विचार केला तर त्यांना आरोपीचा वकील होण्यातच रस नसल्याचे स्पष्ट दिसते. आरोपीचा वकील या नात्याने आपले बौध्दिक कौशल्य पणाला लावून बेणारेचा बचाव करण्यापेक्षा, सरकारी वकील या नात्याने बौध्दिक ताकद लढवून तिला कोंडीत पकडण्यातच अधिक रस असतो. त्यामुळेच ते न्यायाधीशांनी बेणारेला बाजू मांडण्यासाठी दिलेल्या वेळेबाबत विरोध दर्शवित नाहीत. न्यायाधीश झालेले काशीकरसुध्दा बेणारेला एवढा अल्प वेळ का देतात ? त्याचेही कारण स्पष्ट आहे. बेणारेची बाजू पूर्णपणे ऐकून घेवून तिला योग्य न्याय देण्यापेक्षा, साक्षीदार होवून तिची कोंडी करण्यातच काशीकरांना आनंद वाटत असतो. त्यामुळे ते ही निःपक्षपातीवृत्तीने न्याय देत नाहीत. बेणारेचे काही ऐकूनच घ्यावयाचे नाही; या भूमिकेतूनच त्यांनी तिला तिची बाजू मांडण्यासाठी दहासेकंदाचा

वेळ दिला. काशीकरांच्या आणि सुखात्मेंच्या दृष्टीने तिची बाजू ऐकणे निरर्थकच असते, बेणारेला दिला गेलेला दहा सेकंदाचा वेळ संपल्यानंतर "**नाहीतरी सांगून उपयोग होणारच नाही**"[६८] असे न्यायाधीशच म्हणतात. याचा अर्थच बेणारेने जीव तोडून काही सांगितले असते तरी त्याचा उपयोग झाला नसता. न्यायाधीशांचें मन द्रवले नसते कारण न्यायाधीश मधल्या न्यूनगंडप्रेरित काशीकरांनी, बेणारेला नामोहरम करण्याचा निश्चय केलेला असतो. म्हणूनच ते तिला बाजू मांडण्यासाठी अवघा दहा सेकंदाचा वेळ देतात. यापेक्षा अधिक वेळ ते पानाची पिंक थुंकण्याच्या प्रात्यक्षिकाला व चर्चेला देतात. पानाची पिंक थुंकण्यासाठी आरोपीच्या वकीलांना पुरेसा वाटत असणारा दहासेकंदाचा वेळ ते बेणारेची बाजू मांडण्यासाठी देतात, त्याचे कारण दोघाच्या दृष्टीने बेणारेने बाजू मांडणे म्हणजे पानाची पिंक थुंकणे.. अगदी किरकोळ गोष्ट! एकूण बेणारेची कोंडी करावी हाच त्यांचा अंतस्थ हेतू. नेणीवेतील स्तर वर उफाळून आल्यामुळेच काशीकर न्यायाधीशांची आणि सुखात्मे आरोपीच्या वकीलांची भूमिका प्रामाणिकपणे पार पाडू शकत नाहीत. येथे त्यांचा पुर्वग्रहदुषित, अनुचित-संकुचित वृत्तीचे दर्शन घडते.

"शांतता! कोर्ट" नाटकातील स्त्री समस्येच्या चित्रणाला एक मानसशास्त्रीय परिमाण आहे. समूहाच्या हिंस्त्र प्रवृत्तीमुळे निर्माण झालेल्या बेणारेच्या अगतिक अवस्थेलाही मानसशास्त्रीय कारण आहे. हे कारण शोधण्यासाठी व्यक्तिमनाच्या नेणिवेत उतरणे आवश्यक आहे. आपल्या व्यक्तिगत जीवनातील अपयशाचा सूड घेण्याची प्रवृत्ती "बेणारेला आरोपी करण्यापासून ते तिला शिक्षा करेपर्यंतच्या चित्रणातून प्रगट होत जाते. सामंत वगळता सर्वांना बेणारेची पुरती ओळख आहे. तिच्याबद्दलची असूया त्यांच्या नेणीवेत वास करते आहे. अभिरूप न्यायालयाच्या निमित्ताने संधी गवसताच ही नेणीवेतील असूया जाणीवेच्या पातळीवर येवून, अतिरेकी रूप धारण करते. त्यामुळे सुसंस्कृत रूप गळून पडते. वरून सभ्यपणाचा मुखवटा धारण करणा-याचे खरे रूप प्रकट होते. त्यांचे चेहरे भेसूर, निःस्तब्ध प्रेतासारखे वाटतात. त्यांच्याकडे बघून बेणारे (स्वगतामध्ये) म्हणते, "हे विसाव्या शतकातील सुसंस्कृत माणसांचे अवशेष. पाहा कसे एकेकाचे चेहरे रानटी दिसत आहेत ते. त्यांच्या ओठावर झिजलेले सुंदर सुंदर शब्द आहेत. पोटात अतृप्त वासना आहेत."[६९]

"शांतता!कोर्ट" मधील ही झपाटलेली माणसे बेणारेच्या बाबतीत दुष्टपणाने वागतात; हे खरे आहे. परंतु ती गुन्हेगार नाहीत. त्यामुळे त्यांना "**खल**" हे **विशेषण** लावता येत नाही. तेंडुलकर म्हणतात, "गुन्हेगार नसलेल्या माणसांचा क्रौर्यापलिकडे

जाणारा दुष्टपणा आपण पाहतो· माणसे अशी का होतात· माणूस नावाचे रसायन आहे तरी काय याची वास्तवाच्या मुळाशी जावून विचारी माणसांनी तपासणी करण्याची आज आवश्यकता आहे·"[७०]

"शांतता। ··" मधील समूहातील माणसांचा आपण विचार करतो तेव्हा ती माणसं मनोरूग्ण वाटतात· केवळ सामंत अपवाद आहे· माणसाच्या भावना, वासना दडपल्या गेल्या की तो मनोरूग्ण होतो· प्रस्तुत नाटकात बेणारेसह इतर पात्रांच्याही लैंगिक भावना, इच्छा दडपल्या गेल्या आहेत· त्यांच्या जीवनात कोठेतरी त्यांचा कोंडमारा झाला आहे· अहंगंडाने, न्यूनगंडाने ती पछाडली गेली आहेत· आयुष्यातील उणीव व पराभव यामुळे ही माणसे बेणारेचा छळ करतात· इतर पात्रांचे वर्तन समजू शकते पण सामंतही समूहात सहभागी होवून बेणारेला दुखावतात याचे कारण काय असू शकते? त्याची साक्ष ही सुध्दा एक प्रकारे हिंसक वर्तनच आहे· परंतु समूहाच्या व त्याच्या हिंसकवर्तनामागचे मानसशास्त्र समजावून घेतले पाहिजे कारण त्या दोन्ही वर्तनात फरक आहे·

सामंताशिवाय इतर पात्रांचे हिंसक वर्तन हे त्यांच्या नेणीवेतून उफाळून आलेले आहे तर सामंताचे हिंसक वर्तन अजाणतेतून जन्माला आलेले आहे· सामंत सूर्यकांत फातरफेकर यांच्या कादंबरीचा आधार घेवून समूहाच्या हिंस्त्र प्रवृत्तीला चिथावणी देत असला तरी, त्याचा हेतू बेणारेला जाणीवपूर्वक छळण्याचा नाही· हा एक खेळ आहे; त्यात आपल्याला सहभागी करून घेतले आहे तेव्हा आपल्या वाटयाला आलेली भूमिका बजवावी, या सद्हेतूने तो समूहात सहभागी झालेला असतो· त्याचे वेगळेपण त्याच्या उक्ती-कृतीव्दारे स्पष्ट होते· सामंताच्या मनोभूमीचा विचार करता, तो तटस्थ, दुबळा, सहानुभूतीशीलवृत्तीचा पुरूष वाटतो· त्याचा भाबडेपणा, निष्पापवृत्ती विविध प्रसंगी स्पष्ट होते· पहिल्या भेटीतच नाटकाच्या आरंभी बेणारे त्याला म्हणते, "तुम्ही फार चांगले आहात·आणि सांगू का? तुम्ही खूप निष्पाप आणि भले आहात·"[७१]

सामंत हा सद्सद् विवेकाचे प्रतीक आहे· समूहामध्ये सद्सद् विवेकबुध्दी शाबूत असणारे ते एक संवेदनाशीलवृत्तीचे पात्र आहे· समूहाचे छक्केपंजे जाणण्याइतका तो धूर्त नाही· आपल्या साक्षीने बेणारेच्या डोळयात पाणी आलेले पाहून "**अरे रे। एकदम असं काय झालं बाईंना**"[७२] असे कळवळून म्हणतो· त्याला वाटणारी कणव, हळहळ येथे दिसते·

सामंत पुस्तकाचा वापर करून साक्ष देतो. पुस्तक हे स्वप्न व्यवहाराचे प्रतीक.. त्यांनी वापरलेले पुस्तकातील संभाषण बेणारेच्या वास्तव जीवनाला लागू पडते. कारण दुसऱ्या अंकाच्या अखेरीस बेणारेच्या अपरोक्ष सुखात्मे म्हणतात, "मिस्टर सामंतांनी जे पुस्तकातील म्हणून सांगितलं त्यात तथ्य आहे"[७३] त्यावर रोकडे "मला आधीच ठाऊक होतं हे"[७४] म्हणून त्यांच्या विधानाला पृष्टी देतो. आपले संभाषण बेणारे खोलीच्या दारात येवून ऐकत आहे हे लक्षात येताच "श्शू! श्शू!"[७५] असा इतरांना इशारा देतात. त्यांचा कावा बेणारेच्या लक्षात आलेला असतो. ती निश्चयाने बाहेर जायला निघते तर बाहेर जाण्याचे दार बंद असते. ती दार जोरजोराने ठोकते पण ते उघडत नाही. तेव्हा सामंत सोडून सर्वांच्या मुद्रेवर एक विलक्षण चमत्कारिक हर्ष उमटतो. सामंत मात्र उठून तिच्या मदतीसाठी पुढे येतो व खटपट करतो. येथेही सामंताच्या सरळ मनाचा प्रत्यय येतो. आपण दिलेली साक्ष तेवढयापुरतीच आहे, त्याचा पुढे काही अनिष्ट परिणाम होणार आहे याची जाणीव सामंताला नसते. आपल्याला देण्यात येणाऱ्या रात्रीच्या भूमिकेचा सराव व्हावा, या हेतूनेच त्याने साक्ष दिली आहे. "मी तर हे तुमचे प्रोफेसर दामले काळे आहेत की गोरे ते सुध्दा अजून पाहिलेलं नाही"[७६] अशी कबूली देवून तो आपल्या स्वच्छ मनाचे दर्शन घडवितो. "आपल्याला अभिरूप न्यायालयाचा परिचय करून देण्यासाठी चालविलेला हा खोटा खोटा खटला आहे"[७७] या समजूतीने तो सहभागी झाला आहे. त्याची ही मनोभूमिका त्याच्या वागण्या बोलण्यातून सिध्द होते म्हणूनच सामंतचे **"व्यक्तिमन"** सर्वांहून वेगळे वाटते. इतर पात्रांसारखे ते न्यूनगंड व अहंगंड प्रेरित वाटत नाही.

सामंत तटस्थ व विवेकी आहे परंतु न्यूनगंडाने पछाडलेल्या सामुहिक शक्तीपुढे त्याचे सद्सद विवेकाचे ताटस्थ्य गळून पडते आणि तो अभावितपणे कृतिशील होतो. बेणारेवर हल्ला करणाऱ्या समूहामध्ये सहभागी होतो. हा हल्ला जाणीवपूर्वक आहे याची त्याला कल्पना नसते. नाटकाच्या अखेरीस त्याला जेव्हा याची जाणीव होते तेव्हा त्याची स्थिती पाहण्यासारखी आहे. बेणारेच्या घायाळ अवस्थेकडे पाहताना त्याचे डोळे भरून येतात. त्याला काय करावे सुचत नाही. तो बेणारेला **"बाई"** म्हणून अस्पष्ट हाक मारतो. त्याची अवस्था अवघडल्यासारखी होते. बेणारेबद्दल वाटणारी अपार सहानुभूती त्याच्या वर्तनातून स्पष्ट होते. अखेरच्या प्रसंगी त्याची सहानुभूती बेणारेला सावरू शकत नाही कारण ती दुबळी असते. पण किमान सहानुभूती व्यक्त करण्याचा तो प्रयत्न करतो. आपल्या जवळचा हिरवा जर्द पोपट एका अंतरावरून, आदबीने, वात्सल्याने बेणारेपुढे

हळुवारपणे ठेवतो आणि बाहेर निघून जातो. आपल्या पुतण्यासाठी खेळणं म्हणून आणलेला हिरवा कापडी पोपट हे जीवनेच्छेचे प्रतीक आहे. अरविंद कुलकर्णी यांच्या मते, "सामंत एखाद्या आत्मक्लान्त बेणारेला "हिरव्या कापडी पोपटा" च्या रूपाने आवश्यक ती जीवनेच्छा प्रदान करू शकतो." [७८]

उध्वस्त झालेल्या बेणारेची विचारपूस करण्यासाठी "बाई" म्हणून अस्पष्ट हाक मारणारा सामंत, त्यापूर्वी मदत करायचे सोडून हळूवार पावलाने निघून गेलेला समूह, बेणारेचे निपचित पडणे आणि निःशक्तपणे किंचित चाळवणे या पार्श्वभूमीवर नाटकाच्या अखेरीस बेणारेच्याच आवाजातील एक गीत आहे... [७९]

**"चिमणीला मग पोपट बोले, का ग तुझे डोळे ओले ?**

**काय सांगू बाबा, तुला, माझा घरटा कुणी नेला..**

**.....चिव चिव चीव.....**

**कावळेदादा, कावळेदादा माझा घरटा पाहिलास बाबा ?**

**नाही ग नाही, मुळी नाही...तुझा माझा संबंध काही....**

**चिव चिवचीव...."**

अरविंद वामन कुलकर्णी यांनी या गीताचे मानसशास्त्रीय अंगाने विशलेषण केले आहे. "घरटा म्हणजे समाधान, म्हणजे मूलतः लैंगिक इच्छेचे तर्पण. हे सूत्र घेतलेतर प्रस्तुत गीत-प्रतीक उलगडते. कावळा हे या प्रेरणेच्या वंचनेचे प्रतीक तर पोपट जीवनेच्छेचे. चिमणी ही कामेच्छा." [८०] म्हणजे या गीतालाही मानसशास्त्रीय परिमाण आहे.

"शांतता! कोर्ट चालू आहे" नाटकातील स्त्री समस्येच्या चित्रणाची मानसशास्त्रीय अंगाने चिकित्सा करण्यासाठी आपण या नाटकातील व्यक्तिचित्रांच्या मनोभूमीचा, पात्रांच्या परस्पर संबंधाचा, नाटकातील घटनांचा, प्रतीकांचा विचार केला. आता प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्येच्या चित्रणाची वाङ्मयीन समीक्षा करण्यासाठी नाटकातील जीवनानुभूतीच्या स्वरूपाचा, आशय-अभिव्यक्तीचा, त्यातील नवतेचा, व्यक्तिचित्रणांचा, नाटकाचे बलस्थान असणा-या संवादशैलीचा विचार करावयाचा आहे.

## "शांतता! कोर्ट चालू आहे" नाटकातील स्त्री समस्या चित्रणाचा वाङ्मयीन व प्रायोगिकतेच्या दृष्टीने विचार

वास्तव जीवनातील समस्येला हात घालून, ती समस्या समर्थपणे नाटकातून मांडण्याचे सामर्थ्य तेंडुलकरांच्या ठायी आहे. त्यांचे अनुभवविश्व आणि त्यातून तयार झालेली जीवनसृष्टी सखोल व सुक्ष्म आहे. त्यांच्या नाटकातून माणसाची जीवनस्वप्ने, त्याचे प्रेम, भक्ती, कामातुरता, क्रौर्य, हिंस्त्रता, मूल्यभ्रष्टता आदीचे चित्रण भेदकपणे येते. हे चित्रण करत असताना त्यांनी नायक, नायिका, खलनायक अशी पात्ररचना व गुंतागुंत, निरगाठ, उकल अशा जुन्या पध्दतीने संहितालेखन न करता, आपल्या नाटकात **"माणूस आणि त्याचे अंतरंग"** केंद्रबिंदू मानून आशय-अभिव्यक्तीबाबत विविध नवे प्रयोग केले. "शांतता! कोर्ट चालू आहे"नाटकापासून विशिष्ट नाट्यसंबंधात अडकून पडण्याऐवजी त्यांना मुक्त नाट्यसंबंधाचे आकर्षण वाटले व त्यांनी व्यापक जीवनदर्शन घडविले. "शांतता! कोर्ट..."मध्ये चित्रीत केलेली **"कुमारी मातृत्वाची समस्या"** जुनीच आहे. पण ती समस्या मांडण्याची पध्दत मात्र अभिनव आहे. एका अभिरूप न्यायालयाची कलात्मक मांडणी करून, मोठया कल्पकतेने त्यांनी समस्येचे चित्रण केले आहे. तेंडुलकरांची ही कल्पकता मांडणीपुरतीच मर्यादित नाही तर वैशिष्टयपूर्ण व्यक्तिचित्रणे, मिताक्षरी संवादशैली, प्रकाश योजना यातूनही ती प्रत्ययाला येते.

"शांतता! कोर्ट.." चे नाट्य कु.लीला बेणारे या व्यक्तीभोवती गुंफले आहे. त्यातून व्यक्ती आणि तिच्या भोवतीच्या निर्दय परिस्थितीचे दर्शन घडते, माणसाचे दर्शनी रूप आणि अंतर्मन यांच्यातील तफावत तिव्रतेने जाणवते, समाजमनात रूजलेल्या परंपरांचा नव्याने शोध घेवून, त्या परंपरांचे परिणाम स्पष्टपणे व उत्कटपणे मांडण्याचे कार्य हे नाटक करते. समाजात सभ्य, प्रतिष्ठित म्हणवली जाणारी माणसे आतून कशी किडलेली असतात याचे भेदक चित्रण या नाटकात केले आहे. प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्येच्या चित्रणाची वाङ्मयीन समीक्षा करण्यासाठी, नाटकातील जीवनानुभवाचे स्वरूप आणि ते अभिव्यक्त करण्याची शैली, नाटकातील गुणदोष यांची चर्चा करणे आवश्यक आहे.

"शांतता! कोर्ट" मध्ये चित्रीत केलेल्या स्त्री समस्येचा विचार करता, तेंडुलकरांनी अशा प्रकारची कुमारी मातृत्वाची समस्या यापूर्वी **"श्रीमंत"** नाटकात मांडल्याचे आढळते. अर्थात समस्येचे स्वरूप एकच असलेतरी दोन्ही नाटकांच्या अभिव्यक्तीमध्ये साम्य-भेद आहेत.

या प्रकारची समस्या मो·ग·रांगणेकर यांच्या "**वहिनी**", माधव पातकर यांच्या "**एक पाऊल पुढे**", वसंत कानेटकर यांच्या "**मला काही सांगायचय**" यासारख्या नाटकातून चित्रीत झालेली आहे· ही नाटके, विश्वासघातामुळे कुमारी मातृत्व प्राप्त झालेल्या स्त्री ला वैवाहिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी, त्या विश्वासघात केलेल्या पुरूषाला त्या स्त्रीशी लग्न करण्यास भाग पाडावे हा उपाय सुचवितात· परंतु हा उपाय विश्वासघात केलेला पुरूष अविवाहित असेल तर शक्य आहे· "श्रीमंत" मध्ये मथूचा आणि "शांतता। कोर्ट" मध्ये बेणारेचा विश्वासघात केलेले पुरूष विवाहित आहेत· त्यामुळे त्यांच्याबाबतीत हा उपाय अमलात येणे अशक्य आहे·अशावेळी या समस्याग्रस्त स्त्रियांच्याकडे माणूसकीच्यादृष्टीने पाहण्याची व आधार देण्याची गरज असते· त्यादृष्टीने "**श्रीमंत**"मधील श्रीधरने मथूच्या अपत्याचे पितृत्व स्वीकारून मथूची समस्या सोडविली आहे· येथे तेंडुलकरांनी या समस्येचा कौटुंबिकपातळीवर विचार केला आहे· परंतु शांतता। कोर्ट··मध्ये या समस्येचा सामाजिक पातळीवर विचार केला आहे· या नाटकातील पोंक्षे किंवा रोकडे यांना अशाप्रकारे श्रीधर प्रमाणे बेणारेची समस्या सोडविता आली असती· परंतु तेंडुलकरांनी हा पर्याय स्वीकारला नाही त्याचे कारण, सामाजिक दृष्टिकोनातून या समस्येचा विचार करून मानवी प्रवृत्तीवर बोट ठेवण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट दिसतो· आपला विचार स्पष्ट करण्यासाठी त्यांनी "शांतता। कोर्ट·"·मधील समूहात, समाजातल्या विविध क्षेत्रातील व्यक्ती सहभागी करून घेतल्या आहेत· त्या व्यक्ती म्हणजेच समाज· तो कुमारी मातृत्वाच्या समस्येकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, त्यांचे परस्परसंबंध कोणत्या प्रकारचे असतात, त्यांच्या जगण्याचे तत्वज्ञान कोणते असते याचा उलगडा या नाटकातील चित्रणातून होतो·

<u>नाटकातील व्यक्तिरेखा</u> ह्या वास्तवजीवनातील व्यक्तिंचेच प्रतिनिधित्व करीत असतात· नाटकाचा जन्मच मुळी वास्तव अनुभूतीतून होत असतो· नाटककार हा त्या वास्तव अनुभूतीला कल्पनेच्या पातळीवर नाट्यरूप देत असतो· तेंडुलकर म्हणतात, "माझ्या नाटकातल्या जवळजवळ सा-या व्यक्तिरेखा, बरेचसे प्रसंग वास्तवातून घेतलेले आहेत· मला व्यक्तिरेखा, प्रसंग ह्यांची आधी ओळख असावी लागते· त्या मला दिसाव्या लागतात· दिसतात· त्यांचं कुठतरी नातं जुळलेलं असतं· मग त्याच्यातून माझ नाटक सुरू होते·"[८१] शांतता। कोर्ट·"··मधील पात्रे ही तेंडुलकराना नवरात्र उत्सवात एकेठिकाणी अभिरूप न्यायसभेचा कार्यक्रम करण्यासाठी निघालेल्या एका गटात सापडली·[८२] म्हणजे नाटकातील पात्र-प्रसंगाचे वास्तव जीवनाशी नाते असते· अर्थात, हे नाते प्रकट करण्याच्या प्रत्येक नाटककाराच्या तंत्र-पध्दती वेगवेगळ्या

असतात· जीवनानुभूती अभिव्यक्त करण्याची पध्दती स्वतः नाटककार ठरवीत असतो· जीवनाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन कसा आहे, त्यावरही ती अभिव्यक्ती अवलंबून असते·

तेंडुलकर जीवनाचा अगदी वेगळ्या अंगाने वेध घेतात· आपल्या जीवनातील कोमलता, कठोरता, हळवेपणा, भाबडेपणा, संकुचितपणा, नग्नता, हिंसाचार, वैषयिकता असे अनेकपदरी जीवनचित्र ते "शांतता! कोर्ट·"· ·व्दारे साकार करतात· तेंडुलकर म्हणतात, "हिंसाचार, विध्वंसकवृत्ती याबद्दल लेखक म्हणून मला नेहमीच जास्त उत्सुकता वाटत आलेली आहे· माझ्या नाटकातून जे काही या प्रकारचं दर्शन आहे, ते काही मला कळलेल आहे म्हणून झालेल नसून ते ही या उत्सुकतेपोटीच झालेलं आहे· आपल्याभोवती जी विध्वंसक प्रवृत्ती दिसते ती मला घोटाळ्यात टाकते·"[८३] तेंडुलकरांना मानवी मनाचा तळ आणि तिथली गुंतागुंत शोधण्यात विशेष रस वाटतो· "काम आणि हिंसा या माणूस आणि पशू यांना, किंवा प्राणीमात्राला, समान अशा मूळप्रवृत्ती आहेत असे गृहीत धरून ते प्रसंग शोधतात"[८४] असे शांतता! कोर्टच्या बाबतीत स्पष्ट करून स·शि·भावे म्हणतात,"माणूस हीच सर्वात **"गूढ व्यक्तिरेखा"** ( enigmatic character ) आहे, या गृहीत कृत्यापर्यंत तेंडुलकर आले आहेत·"[८५] आयुष्यात आपण कुठलही पाप केल नाही, गुन्हा केला नाही· अस म्हणणा-या माणसाच्या प्रामाणिकपणाबद्दल तेंडुलकरांना नेहमी शंका येते·[८६] यासाठी ते माणसाचे वरकरणी वर्तन बघून थांबत नाहीत तर त्याच्या मनोव्यापारातही आतून डोकावून बघतात· त्याच्या इच्छा, इतर माणसांशी येणारे संबंध, भाव-भावना, ताण-तणाव यांचा ते बारकाईने विचार करतात· डॉ·चंद्रशेखर बर्वे म्हणतात,"तेंडुलकरांना प्राधान्याने विविध मानवी संबंधाचें, मनातील गुंत्याचे, त्यांच्या करूण-भीषण पर्यावसनाचे दर्शन अभिप्रेत आहे··· पहिल्या नाटकापासून शेवटच्या नाटकापर्यंत तेंडुलकरांचे लक्ष आकृष्ट झालेले दिसते ते माणसाच्या माणूस म्हणून जगू पहाणा-या धडपडीकडे· मग ती धडपड स्त्री ची असो वा पुरूषाची·"[८७]

माणूस म्हणून स्वतंत्रपणे जगावे, अशी प्रत्येक व्यक्तीची इच्छा असते· "शांतता! कोर्ट" मधील बेणारेचीही तशीच इच्छा आहे· बेणारे ही नाटकाची प्रमुख व्यक्तिरेखा· ती शिक्षिका आहे· फटकळपणे बोलणारी, अल्लडपणे वागणारी, **"माझं काय करणार ते? काय करणार?"**[८८] असे दर्डावून विचारणारी, वरवर बंडखोर वाटणारी पण आतून कोणत्यातरी, दडपणाखाली, भितीखाली वावरणारी बेणारे, नाटकाच्या प्रारंभी भेटते· पण तिची बाह्य प्रसन्नवृत्ती नाटकाच्या

अखेरपर्यंत टिकत नाही· प्रथम अंकात प्रसन्नपणे हसणारी, नाचणारी, टोमणे मारणारी बेणारे दुस-या अंकात बिथरत जाते· स्वतःला सावरण्याचा गंभीरपणे प्रयत्न करते आणि तिस-या अंकात गलितगात्र होवून निपचित पडते· तिच्या भाववृत्तीत होणारे बदल, तिचे पालटत जाणारे रूप तेंडुलकरांनी हळूवारपणे व तितकेच मनोवेधकतेने चित्रीत केले आहे·

तेंडुलकरांनी पहिल्या अंकाच्या प्रारंभी; चित्रीत करावयाचे असलेल्या समस्येचे व संघर्षाचे सुतोवाच केले आहे· सामंताबरोबर बोलताना बेणारेच्या मनात सलणा-या दुःखाची व तिच्या समस्येची कल्पना येते· त्यादृष्टीने कंस सूचनेतील,"अभावितपणे ओटीपोटीवर हात, एकदम अडून सामंतावर नजर जाऊन गप्प होते· क्रमशः भानावर येते"[८९] हा उल्लेख महत्वाचा आहे· बेणारेच्या समस्येची कल्पना अशाप्रकारे आलीतरी, त्याला पुष्टी मिळते ती दुस-या अंकातील सामंताच्या साक्षीने· तिथून ख-या अर्थाने बेणारेवर चिखलफेक व्हायला सुरूवात होते· सामंतानी साक्षीसाठी वापरलेले पुस्तकातील संभाषण, वस्तुस्थितीला हात घालते· त्यामुळे सामंताची साक्ष ही कलाटणी देणारी आहे· दामले-बेणारेचे काल्पनिक संभाषण, सामंत फातर्फेकरांच्या कादंबरीतून वाचतात· ते चपखल बसते· यात डॉ·रमेश धोगडेंना सारा कृत्रिमपणा जाणवतो·[९०] परंतु सामंताचा भाबडेपणा, अजाणतेपणा "सहज" आहे हे दाखविण्यसाठी तेंडुलकरांनी सामंताच्या हाती पुस्तक देवून, त्याला त्याचा वापर करावयास लावलेला दिसतो· समाजात सामंतासारखेही काही लोक आहेत; जे अभावितपणे ओढले जातात व नकळत समाजाच्या हिंस्त्रप्रवृत्तीला खतपाणी घालतात; हेच सुचित करावयाचा तेंडुलकरांचा हेतू असावा· सामंताच्या साक्षीनंतर सारेच साक्षीदार बेणारेवर तुटून पडतात· बेणारे अस्वस्थ होते· वैतागून जाते· पण बंद दरवाजामुळे तिला बाहेरही जाता येत नाही· सभोवतालच्या माणसांचा हल्ला सहन करावा लागतो· एकाकीपणे ती प्रतिकार करण्याचा प्रयत्न करते· पण सामुहिक हिंस्त्रतेपुढे तिचा टिकाव लागत नाही· ती उध्वस्त होते· कुमारी मातृत्वाच्या समस्येने ग्रासलेल्या स्त्रीच्या वाटयाला येणारी विटंबना मानहानी, प्रस्तुत नाटकाच्या चित्रणातून-बेणारेच्या व्यक्तिचित्रणातून रेखाटली आहे·

प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण वेधक करण्यासाठी तेंडुलकरांनी काही गोष्टी,(पहिल्या अंकात) खुबीने योजल्या आहेत· उदा·दार बंद होणे, व्यक्तिस्वातंत्र्यावरील भाष्य, सौ·काशीकरांनी शाळेची केलेली चौकशी, पोंक्षेंची मैत्रीणीबद्दलची विचारपूस इ· तसेच तेंडुलकरांनी बंद दरवाजाचा उपयोग तिची कोंडी करण्यासाठी केला आहे· बेणारेचा एवढा

छळ होवूनही, बाहेर पडण्याची इच्छा असूनही बाहेर पडता येवू नये, यासाठीच बंद दरवाजाची क्लुप्ती योजली आहे. तसेच व्यक्तिस्वातंत्र्यावरचे तिचे प्रारंभीचे भाष्य हे "**व्यक्ती आणि समाज**" यांच्यातील संघर्षाचे सुतोवाच आहे. बेणारेची अस्वस्थता दाखविण्यासाठी व पाणी कुठेतरी मुरते आहे, हे सुचित करण्यासाठी शाळेच्या व मैत्रीणीच्या चौकशीचा उल्लेख केला आहे. या उल्लेखाचा धागा त्यांनी तिस-या अंकात जोडून बेणारेची समस्या उजेडात आणली आहे.

बेणारे ही प्रस्थापित समाजव्यवस्थेमुळे व हिंस्त्रप्रवृत्तीमुळे "लक्ष्य" बनते. न्यायालयातही तिच्यावर अन्याय होतो. "**समाज, त्या समाजातील माणसं आणि त्यांचा जीवन संघर्ष**" यावर भाष्य करताना तेंडुलकर म्हणतात, " आजची आपली परिस्थिती अभूतपूर्व गुंतागुंतीची आहे. सर्व संदर्भ बदलले आहेत. जुनी मूल्यव्यवस्था कालबाह्य झाली आहे. प्रस्थापित विचारप्रणाली आणि त्यांची परिभाषा आजच्या समस्यांच्या हिशोबात निकामी ठरली आहे. या जागी नवं आणि उपयोगाचं काही शोधण्याचे प्रयत्न असलेतरी अद्याप तसं काही रूजत नाही. माणूस संभ्रान्त आणि त्याने निर्माण केलेल्या यंत्रणा कुचकामी झाल्या आहेत. त्या रक्षण करण्याऐवजी भक्षक झाल्या आहेत. मानवी मनाचं झपाटयानं अ-मानुषीकरण घडत आहे."[९१]

बेणारे आपल्यापरीने समाजाविरूध्द लढण्याचा प्रयत्न करते व अखेरीस पराभूत होते. तेंडुलकरांना लढणा-या माणसाविषयी आदर आणि आत्मियता वाटते. त्यांच्या पराभवचं दुःख वाटत. ते म्हणतात, "**आजच्या लढाया हरण्यासाठीच आहेत. त्यात उद्याच्या विजयाची अपेक्षा आहे**"[९२] बेणारेची लढाई व तिचा पराभव हा तिच्या एकटीचा नाही. ती एक प्रतिनिधी आहे. नाटकातील इतर पात्रे म्हणजे समाज. ते समाजाचे प्रतिनिधी आहेत. वास्तव जीवनात अशा प्रकारची लढाई अटळ असते. परंतु प्रस्तुत नाटकातील बेणारेच्या व्यक्तिचित्रणाचा विचार करता, तिला ही लढाई टाळता आली असती का? असा प्रश्न उपस्थित होतो. याबाबत प्रस्तुत नाटकाच्या अभ्यासकांनी जी मते नोंदवली आहेत, त्यांचा मागोवा घेणे गरजेचे आहे.

"बेणारेची अंदरकी बात पोंक्षे आणि रोकडे यांना ठाऊक आहे, अशा परिस्थितीत बेणारे अभिरूप न्यायसभेस येते" हे श्री.प्रभाकर पाध्ये यांना पटत नाही.[९३] डॉ. रमेश धोंगडे हे त्यावर असे स्पष्टीकरण करतात की, जी बेणारे पोटात "**पाप**" असता

नोकरीवर जाण्यास निदान तिला काढून टाकेपर्यंत तरी भीत नाही· तिनं जागृत सभेला का भ्यावं ? शिवाय अभिरूप न्यायसभेत तिच्यावरच आरोप ठेवतील आणि तो ही भ्रूणहत्येचा याची कोणालाचा कल्पना नसते·"[१४] डॉ·धोंगडेच्या स्पष्टीकरणाचे दोन भाग करून त्यावर स्वतंत्रपणे विचार करता येईल· एक - जी बेणारे पोटात पाप असताना नोकरीवर जाण्यास भीत नाही· यावर पाध्येंचे असे मत आहे की, बेणारेच्या शाळेत तिचे गुपित विशिष्ट पध्दतीने माहिती असणारे कोणी रोकडे पोंक्षे असते तर ती शाळेतही गेली नसती· शिवाय शाळेवर तिचे पोट अवलंबून असते· त्या बाबतीत ती मजबूर असते· जागृति सभा ही एक हौस असते·[१५] याचा अर्थ शाळेत रोकडे पोंक्षे सारखे कोणी नसल्यामुळेच ती शाळेत जायला धजवते· मग प्रश्न असा - प्रत्यक्ष रोकडे-पोंक्षे जागृत सभेस हजर असताना ती का जाते ? हौस म्हणून जाते का ? याचे उत्तर असे की आपले व्यक्तिगत दुःख विसरावे हा तिचा हेतू असावा· प्रत्यक्ष आपल्या दुःखाला वाचा फुटणार आहे हे तिला ठाऊक असते तर ती तेथे गेलीच नसती· यादृष्टीने डॉ·धोंगडे च्या स्पष्टीकरणाचा दुसरा भाग - न्यायसभेस तिच्यावर आरोप ठेवतील आणि तो ही भ्रूणहत्येचा याची कोणालाच कल्पना नसते" संयुक्तिक वाटतो· मुख्य कार्यक्रमापूर्वी वेळ शिल्लक राहिला तर मंडळी त्या मुख्य कार्यक्रमाची रंगीत तालीम करीत असावेत असे त्यांच्या संभाषणावरून वाटते· परंतु यावेळी शिल्लक वेळ मजेत घालविण्यासाठी व सामंताला अभिरूप न्यायालयाचा परिचय करून देण्यासाठी "एक गंमतीचा खेळ" म्हणून काल्पनिक खटला चालविण्याची कल्पना सुखात्मेंच्या डोक्यातून बाहेर पडते· तशा प्रकारचा खटला ते आपल्या बाररूम मध्ये खेळत असल्याचे सांगतात·[१६] म्हणजे ही काल्पनिक खटल्याची कल्पना बेणारेला नवी आहे· प्रत्येक वेळी कोणाला तरी एकाला आरोपी करून, फावला वेळ मजेत घालविण्याची पध्दत यापूर्वी चालू असतीतर कदाचित बेणारे आली नसती· तिच्या येण्यामागे हौस आणि दुःखाचा विसर हीच कारणे अधिक योग्य वाटतात·

आता दुस-या बाजूने असा विचार करूया की, काल्पनिक खटल्याच्या परिणामांची जाणीव असूनही बेणारे जागृत सभेस आली आहे· तिला हे माहित आहे की आपल्यावर खटला चालविला जाणार आहे· तर मग अशा परिस्थितीत तिला बंडखोर दाखवून नाटक चित्रीत करावे लागले असते· त्यातून एक नवीनच नाटक निर्माण झाले असते· परंतु तेंडुलकरांनी तसे केले नाही· डॉ·धोंगडेच्या मते," बेणारेला कृत्रिमरित्या बंडखोर करण्याचा मोह तेंडुलकरांनी फार समजुतदारपणे टाळला आहे·"[१७] प्रस्तुत नाटकनिर्मितीमागील तेंडुलकरांचा

मूळ हेतू· "कुमारी मातृत्वाच्या समस्येने ग्रासलेल्या एका शिक्षित, पण असहाय्य स्त्री ला कोंडीत पकडून समाज तिची कशी क्रूर विटंबना करतो," हे चित्रीत करण्याचा असल्याने त्यांनी बेणारेला बंडखोर दाखवले नाही तर **"एक सामान्य स्त्री"** म्हणूनच त्यांनी तिचे चित्रण केले आहे· तिच्या मनाचे पदर त्यांनी एकेका प्रसंगातून उलगडत नेवून परिणामाप्रत आणले आहे· प्रारंभी ती बंडखोरीची भाषा वापरते, पण कुठपर्यंत ? जोपर्यंत प्रत्यक्ष प्रसंगाला सामोरे जावे लागत नाही तोपर्यंत· जेव्हा प्रत्यक्ष प्रसंगाला सामोरे जावे लागते तेव्हा मात्र स्वतःला सावरण्याच्या प्रयत्नात तिचे अवसान गळून पडते· नाटकाच्या अखेरीस तेंडुलकरांनी बेणारेला बोलते केले आहे· तिचे हे बोलणे नाटकात **"स्वगत"** म्हणून येते·

**बेणारेचे स्वगत** हे तिच्या अंतर्मनावर प्रकाश टाकते· अरविंद कुलकर्णींच्या मते, "बेणारेचे स्वगत म्हणजे तिच्या नेणीवेत दडपल्या गेलेल्या सूत्रांचा स्फोट आहे"[९८] स्वगतातून बेणारेंचे मनोविश्व साकार होते· तिच्या व्यक्तिगत जीवनातील कटू-गोड अनुभवांचे चित्रण त्यात येते· परंतु सामाजिक भाष्य मात्र त्यात व्यक्त होत नाही· ती छळणा-या माणसांचा निर्देश करते परंतु सामाजिक हिंस्त्र प्रवृत्तीवर बोलत नाही· तिने सामाजिक भाष्य केले असतेतर तिचे स्वगत व्यक्तिगत पातळीवर न राहता, त्याला व्यापक सामाजिक मूल्य प्राप्त झाले असते·

बेणारेची कैफियत म्हणजेच स्वगत, नाट्यदृष्ट्या आवश्यक की अनावश्यक यावरही अभ्यासकांची मतांतरे दिसतात· "कु·बेणारे हिची कैफियत तेंडुलकरांनी दिली नसती तर बरे झाले असते· संपूर्ण कैफियत नाटकातील प्रॉब्लेम समजावून सांगणारी, भावविवशतेच्या साहयाने प्रेक्षकांना कु·बेणारेच्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न करणारी आणि आपण काहीतरी मूलभूत पेच समोर आणतो आहोत हे मिरवणारी आहे·"[९९] असे मत मांडले गेले· बेणारेने स्वगतामध्ये व्यक्तीचे खाजगी आयुष्य व समाज यावर भाष्य केले आहे· द·भि·कुलकर्णी यांना बेणारेचे हे भाष्य हळवे व तर्कदुष्ट वाटतेच शिवाय ते नाट्यमूळाशी विसंगत, अप्रस्तुत, नाटकी व अनावश्यक वाटते·[१००] बेणारे व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करते ती म्हणते, "माझं खाजगी चारित्र्य हा माझा प्रश्न आहे· माझं मी काय करावं हे मीच ठरवीन जसं प्रत्येकाला स्वतःपुरते ते ठरविता आले पाहिजे·"[१०१] कुलकर्णींच्या मते," हे तिच म्हणणं व्यक्तिस्वातंत्र्याच्या संदर्भातही चूक ठरेल हा मुद्दा महत्वाचा नसून तिने भोवतीची माणसे आपल्याशी क्रूर का वागली हे नेमके ओळखले नाही· हा मुद्दा महत्वाचा आहे·[१०२]

माणसं फार क्रूर होवू शकतात हे बेणारेने ओळखले पण ती माणसे आता नेमक्या कोणत्या कारणाने क्रूर झाली आहेत हे तिने जाणले असते तर आयुष्यातील यशापयश, सुखदुःख, उणीव, समृध्दी यासंबंधी ती काही बोलली असती व ते मग नाट्यमूल्यास धरून झाले असते. मग त्या नाटकाचे हे आकलनही सबल झाले असते. आज नाटकाचे हे आकलन प्राथमिक आणि स्थूल झाले आहे. त्याला कुठलेही तात्विक व सामाजिक परिमाण नसून (आपल्या अपयशाचा दुस-यावर सूड असे) जुजबी मानसशास्त्रीय परिमाण आहे त्यामुळे इतर पात्रांची क्रूरता आणि बेणारेची आगतिकता नाटकी वाटते".

वरील अभ्यासकांनी स्वगताच्या अनावश्यकतेबाबत नोंदविलेली मते ग्राहय वाटत नाही. स्वगत हे आवश्यकच वाटते. स्वगत कसे असावे, याबाबत यांनी व्यक्त केलेली अपेक्षा मात्र रास्त वाटते. स्वगतामध्ये बेणारे केवळ स्वतःबद्दल बोलते. हे तिचे बोलणे आपले निरपराधित्व सिध्द करणारे वाटते. तिने बोलताना समाजव्यवस्थेवर, रूढिग्रस्त परंपरावर भाष्य केले असते तर ते स्वगत अधिक परिपूर्ण व प्रभावी झाले असते. सामाजिक जाणीव निर्माण करून देण्यापेक्षा बेणारेला सहानुभूती मिळवून देण्यासाठीच हे स्वगत अधिक उपयोगी पडते. व्यक्तिगत जीवनातील प्रसंग सांगून तिने सहानुभूती मिळविण्यास हरकत नाही परंतु छळणा-या समाजातील प्रवृत्तीवर भाष्य करून तिने ही सहानुभूती मिळविली असतीतर सामाजिकदृष्टया ते अधिक संयुक्तिक झाले असते. पण तसे न करता तेंडुलकरांनी केवळ बेणारेवर प्रकाशझोत टाकून स्वगताव्दारे तिची मनोभूमिका स्पष्ट केली आहे.

रा.भा.पाटणकरांच्या मते, "नाटककाराने दुस-या अंकापासून बेणारेला **"निरपराध जीव"** ठरवले आहे. तिच्या विषयी सहानुभूती निर्माण केली आहे. तिची तिस-या अंकातील लांबलचक कैफियत म्हणजे थोडेसे **"हिस्टेरिकल"** पध्दतीने मांडलेले उदात्त पण सोपे विचार. थोडक्यात तिला हौतात्म्य दिले आहे."[१०३] डॉ.धोंगडेनाही बेणारेचे स्वगत थोडेसे **"हिस्टेरिकल"** वाटते. परंतु एखाद्या हुतात्म्याला शोभतील असे तिचे विचार वाटत नाहीत. त्यांना तिचे बोलणे खांडेकरी पध्दतीचे वाटते. त्यांच्यामते, "बेणारेचे स्वगत ख-या अर्थाने स्वगत नाही. ते तिच्या अंतर्मनातील कल्लोळाचा तेंडुलकरांनी केलेला अविष्कार आहे. त्यामुळे त्यांच्या शैलीचा आणि बेणारेच्या व्यक्तिरेखेचा संबंध जोडणे थोडेसे अन्यायाचे आहे तरी पण बेणारे थोडी अधिक मुग्ध झाली असती तरी चालले असते."[१०४]परंतु बेणारे

ही शिक्षिका असल्याने तिची बोलण्याची शैली वा खांडेकरी पध्दतीची भाषा आक्षेपार्ह वाटत नाही· स्वगतामधूनही तिचे शिक्षकीपण दिसते· आणि शिक्षकीपेशामध्ये अशी भाषा शिकवताना वापरली जाते· " **श्शू! आवाज बंद! सायलेन्स! किती गोंगाट?**"[१०५] या तिच्या उद्‌गारावरून ती शिक्षकीपेशाशी समरस झालेली दिसते· "पिंज-यातून बाहेर आलेली, सर्वभर फिरू लागते, वर्गात फिरेल तशी" ही कंस सूचना[१०६] व "**देवासारखे बसा सर्व**" हे उद्‌गारही या संदर्भात महत्वाचे आहेत· समूहातील माणसांची ओळख करून देताना, "**बिचारे! मुलांनो, हे सर्व कोण? हे विसाव्या शतकातील सुसंस्कृत माणसांचे अवशेष· पाहा कसे एकेकाचे चेहरे रानटी दिसत आहेत ते·**"[१०७] बेणारेची बोलण्याची ढब पाहिली तर तिचे शिक्षकीरूपच व्यक्त होते व ते व्यक्त करण्यासाठी तेंडुलकरांनी तिच्या तोंडी तशी भाषा वापरली आहे· तिच्या भाषेत आवेश आहे· भाषेला फुलोरा आहे· बोलण्यात प्रश्न आहेत, स्पष्टीकरण आहे· **"न जीवनं जीवनमर्हति"** असं संस्कृत भाष्य आहे· तळमळ आहे, त्रागा आहे· शिक्षिकापेशाशी साजेसेच तिचे बोलणे आहे· त्यामुळे तिची भाषाशैली उसनी वाटत नाही· आणि धोंगडे म्हणतात त्याप्रमाणे "तिच्या अंतर्मनातील तेंडुलकरांनी केलेला "अविष्कार" वाटत नाही· बेणारेने स्वतः केलेलाच अविष्कार वाटतो·

बेणारे शिक्षिका आहे, याचा विसर तेंडुलकरांनी पडू दिला नाही· शिक्षिका म्हटल्यावर ती थोडीफार गंभीर असावी अशी अपेक्षा असते· परंतु तेंडुलकरांनी नाटकाच्या प्रारंभी तिला अल्लडपणाने वागताना दाखविले आहे, कारण तिच्या अल्लडपणालाही मानसशास्त्रीय परिमाण आहे· नंतर तिचा अल्लडपणा हळूहळू कमी होत गेलेला दाखवून तिला गंभीररूप दिले आहे· समस्या चित्रणाच्या दृष्टीने, तिस-या अंकात तिला मुकं व आतून अस्वस्थ ठेवले आहे· कुमारी मातृत्व समस्येने ग्रस्त स्त्रीला मुर्दाड, हिंस्त्र समाजाकडून "तोंड दाबून बुक्काचा मार" सहन करावा लागतो, हेच तिच्या मुकंपणातून सूचित केले आहे· अशा स्त्रीचे हृद्‌गत समजून घ्यावे यासाठीच तेंडुलकरांनी **"स्वगता"**ची योजना केली आहे·

बेणारेचे निरपराधित्व, मातृत्वाची नैसर्गिक ओढ, गर्भ जपण्याचा, वाढविण्याचा, त्याला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा निर्धार, तिच्या स्वगतातून व्यक्त होतो· कुमारी मातृत्वाच्या समस्येने ग्रासलेल्या स्त्रीचे अंतर्मन समाजाने समजून घेतले पाहिजे व अशा स्त्रीकडे अमानुषवृत्तीने नाहीतर माणूसकीच्या दृष्टीने पाहिले पाहिजे" हाच दृष्टिकोन बेणारेच्या व्यक्तिचित्रणातून स्पष्ट होतो·

बेणारेंशिवाय प्रस्तुत नाटकात काशीकर दांपत्य, सुखात्मे, पोंक्षे, कर्णिक, रोकडे, सामंत ही प्रत्यक्ष व दामले, शिंदे सारखी अप्रत्यक्ष पात्रं भेटतात·या सा-यांच्या व्यक्ति-चित्रणातून तेंडुलकरांनी "कुमारी मातृत्वाच्या समस्ये"कडे पाहण्याची समाजप्रवृत्ती दाखविली आहे· सुखात्मे, काशीकरांसारखी जबाबदार माणसेही किती रूढी- परंपराप्रिय असतात, याचे चित्रण केले आहे· याच रूढी परंपरेमुळे पोंक्षे, रोकडे सारखे अविवाहित पुरूषही, बेणारेने लग्नाची मागणी करूनही तिचा स्वीकार करू शकत नाहीत· ते देहसापेक्ष नैतिकतेस महत्व देतात·[१०८] "आपल्याला दिवस गेल्याचे सांगून आपल्याशी लग्न करण्याची इच्छा[१०९] बेणारेने प्रकट केली होती" असे पोंक्षे सांगतात· त्यावर काशीकर छद्मीपणाने विचारतात की, "एकापासून दिवस गेल्याचे सांगून मिस्·बेणारेंनी तुमच्याशी म्हणजे दुस-याशी लग्न करण्याची इच्छा प्रकट केली होती?"[११०] बेणारेची पूर्ण परिस्थिती जाणून घेणे तर दूरच··पण तिने अशी इच्छा बाळगणेही समाजात गैर वाटते· अशा समस्याग्रस्त स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही सुखात्मेंच्या उपहासात्मक प्रश्नातून व्यक्त होतो· ते विचारतात, "मानवतावादी विशाल दृष्टिकोनातून सवत्सधेनूचा स्वीकार करायला तयार झालात?"[१११] पोंक्षे आपण लग्नाला तयार झालो नसल्याची कबुली देतात·[११२] तेंडुलकर येथे समाजातील मानवतावादी विचारांचा अभाव चित्रीत करतात· पात्रांच्या संभाषणातून बेणारेबाबत जो उपहास, विरोध जाणवतो तो रूढिप्रिय परंपरांचे व समाजव्यवस्थेचे द्योतक आहे· समाजातील कर्त्यासवरत्या मंडळींनी दाखविलेली ही उदासिनता आहे· ह्या मंडळींकडून अशा स्त्रियांच्या समस्येबाबत ठोस उपायाची अपेक्षा आहे, पण तिथेही उपेक्षाच होते· काशीकर कुमारी मातृत्वाच्या समस्येवर जो उपाय सुचवितात तो कालबाह्य आहे· ते म्हणतात, "पुन्हा एकवार समाजात बालविवाह रूढ झाले पाहिजेत, पदर यायच्या आत मुलींची लग्न· सगळे अनाचार साफ बंद होतील· सगळ्यात आमच्या समाजाचं नुकसान कोणी केले असेल तर ते आगरकरांनी आणि धोंडो केशव कर्व्यांनी· अस माझं स्पष्ट मत आहे·"[११३] रोकडे हे वाक्य घाईने टिपून घेतो· ज्या महापुरूषांची नावे काशीकर घेतात, त्यांच योगदान लक्षात घेत नाहीत· बालविवाहाचे दुष्परिणाम सोसणा-या अजाण मुलींची दुःख अनेक महात्म्यांनी जाणली· या रूढीच्या उच्चाटनांसाठी प्रयत्न करून यश मिळविले ती रूढी प्रस्थापित करण्याची भाषा काशीकर बोलतात·"काशीकर हा आपल्यापैकी बहुतेकांचा विचारवंत आहे, आणि आपण सगळे रोकडे आहोत"[११४] अशी परखड प्रतिक्रिया गो·पु·देशपांडे नोंदवितात· येथे समाजसुधारक म्हणविणा-या काशीकरांच्या विचारांची मर्यादा लक्षात येते· त्यांच्या वृत्तीची कीव करावी वाटतेच, शिवाय यातून त्यांचा मागासलेपणा हा स्पष्ट

दिसतो. न्यायाधीशाचे ते 'साक्षीदार' होतात तेव्हा त्यांच्या विचारातील कोतेपणा अधिक स्पष्ट होतो. "बिन लग्नाच्या प्रौढ मुली ही समाजाला लागलेली अनैतिक कीड आहे"[११५] असे मत ते मांडतात. काशीकरांना साथ देणारी त्यांची पत्नीही काही वेगळ्या विचाराची नाही. चौतिसाव्या वर्षापर्यंत बेणारेचे लग्न का न व्हावं याचा खुलासा त्या करतात तो असा, "लग्नाशिवाय सगळं काही मिळालं म्हणजे हल्लीच्या काळात असंच होतं. सुख हवं, पण जबाबदारी नको. या मिळवतेपणाच्या नावाखाली सगळी अनीती बोकाळली आहे समाजात" अर्थार्जन करणा-या स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दुषित दृष्टिकोन तेंडुलकर येथे चित्रीत करतात.

कुमारी मातृत्वाच्या समस्येने ग्रासलेल्या स्त्रीला निदान स्त्रीने तरी समजावून घ्यावे ही अपेक्षा असते. परंतु सौ.काशीकर बेणारेची समस्या ओळखून, तिची निंदानालस्ती करण्यासाठी अगदी पदर सावरून उत्साहाने पुढे येतात, यावर काशीकर म्हणतातदेखील, "पाहा! याला उत्साह म्हणतात"[११६] याचा अर्थ अशा स्त्रियांना समाजातील स्त्रियांकडूनही मानसिक आधार मिळत नाही; हेच तेंडुलकर सौ.काशीकरांच्या व्यक्तिचित्रणातून स्पष्ट करतात.

कोर्टात एवढया गहन विषयावर चर्चा चालू असताना काशीकरांचे कान कोरणे, सौ.काशीकरांचे विणकाम करणे, पोंक्षेचे पाईप ओढणे, अशा गोष्टी चालतात. एखाद्याच्या जीवनमरणाचा खेळ चालू आहे, याचे गांभीर्य असण्यापेक्षा, त्यांच्या या कृतीतून समस्येकडे पाहण्याची "सहज प्रवृत्ती" दिसते.काशीकरांना, सुखात्मेंना मातृत्व महन्मंगल व पवित्र वाटते. पण कुमारी मातृत्व त्यांना भयंकर कृत्य-गुन्हा वाटते. सुखात्मे बेणारेला "नंबर एकचा समाजशत्रू" म्हणतात. "विवाहविना मातृत्व हे आपल्या धर्मानं आणि परंपरेने फार मोठ पापं मानलं आहे" असे ते सांगतात.[११७] कर्णिकांच्या लेखी "बाळंत होते ती माता." मग ते मातृत्व मुलांना जन्म देणारे असो वा पिलांना जन्म देणा-या कुत्रीचे असो. "माणसंच माता असतात आणि कुत्री नसतात असं कोण म्हणतो?"[११८] स्त्रीच्या मातृत्वाकडे बघण्याची कर्णिकांची मर्यादित दृष्टी येथे स्पष्ट होते.

बेणारेला असलेली मातृत्वाची नैसर्गिक ओढ आणि ती संतती वाढविण्याचा तिचा निर्धारही समाजाला पटत नाही. आरोपीचा निश्चय तडीस गेल्यास समाजाचं अस्तित्वच धोक्यात येणार असून नैतिक मूल्यनामक चीजच अस्तित्वात राहणार नाही अशी भिती सुखात्मेंना वाटते. ते म्हणतात, "आपली परंपरा, आपली अस्मिता, झालचं तर आपली

संस्कृती आणि आपला धर्म यांच्या मुळाशीच आरोपीने अशाप्रकारे सुरूंग लावण्याचा निर्धार केला असून तो मोडून काढणं न्यायदेवतेचं आणि आपल्यापैकी प्रत्येक सुज्ञ आणि विचारी नागरिकाचं पवित्र आणि अत्यावश्यक कर्तव्य ठरतं".[११९]

आज स्त्री-पुरूषाला कायद्याने समान अधिकार दिले, तिकडे लक्ष न देता सुखात्मे, "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" या मनुस्मृतीने घालून दिलेल्या नियमाची आठवण करून देऊन सर्वांच्या वतीने मागणी करतात की, "न मिस बेणारे स्वातंत्र्यमर्हति" आरोपीला दयामाया न दाखविता कोर्टानं त्याच्या भयंकर गुन्हयाबद्दल मोठ्यात मोठी सक्त सजा द्यावी."[१२०]

तेंडुलकरांनी प्रस्तुत नाटकातील सुखात्मेंना दुहेरी भुमिका दिली आहे. त्यात सरकारी वकील म्हणून त्यांना अधिक वाव देवून प्रभावी दाखविले आहे व आरोपीचे वकील म्हणून निष्प्रभ दाखविले आहे. तर न्यायाधीश म्हणून काशीकरांना पक्षपाती दाखविले आहे, आरोपीची पूर्ण बाजू ऐकण्यापूर्वीच त्यांनी तिला शिक्षा देण्याचे ठरविले आहे.[१२१] यामागे काशीकर, सुखात्मेंचे मूळ रूप दाखवावे, हेच मानसशास्त्रीय कारण आहे. "शांतता" मधील समूहाच्या रूपाने त्यांनी समाजाचा सहानुभूतीशून्य दृष्टिकोन चित्रीत केला आहे. प्रस्तुत नाटकातील सामंत वगळता सर्व पात्रे-अगदी बेणारेसह-व्यक्तिगत जीवनात अपयशी दाखविली आहेत. त्यांच्यात व बेणारेत फरक एवढाच की, बेणारे अपयशामुळे दुःखी झालेली नाही. प्रसन्नवृत्तीने वावरते. नेमकी हीच तिची वृत्ती इतरांच्या संकुचित मनाला खटकते. तिनेही तिची समस्या लक्षात घेता, दुःखी राहिले पाहिजे, राहात नसेल तर तिला तसे दुःखी केले पाहिजे, या मनोविकृत विचाराने ही पात्र झपाटली जातात. प्रचलित परंपरेचे शस्त्र हातात घेवून सपासप वार करीत ते तिला हिंस्त्रपणाने छळतात, उध्वस्त करतात. बेणारेसारख्या समस्याग्रस्त स्त्रियांच्या वाटयाला येणारी ही भयानक शोकांतिका, तेंडुलकरांनी उत्कटतेने चित्रीत केली आहे. "शांतता। कोर्ट" मधील समूहामध्ये "सामंत" हा अपवाद म्हटला पाहिजे. तेंडुलकरांनी त्यात त्याला भोळ्या,भाबडयावृत्तीचा,सद्सद्विवेकबुध्दीचा दाखविला आहे. एकमेव सामंतच बेणारेच्या समस्येकडे सहानुभूतीने पाहतो. परंतु त्याची सहानुभूती ही दुबळी आहे. बेणारेच्या जीवनाला कलाटणी देण्याची ताकद त्याच्या सहानुभूतीत नाही. एकंदर बेणारेसारखी असहाय्य स्त्री सामाजिक अवहेलनाचा व आक्रमणाचा विषय होते. हेच "शांतता।कोर्ट" मधील व्यक्तिचित्रणाव्दारे, तेंडुलकरांनी मोठया मार्मिकतेने स्पष्ट केले आहे.

## संवाद लेखन :-

नाटककार हा काय सांगतो हे जसे महत्वाचे तसेच, कसे सांगतो, हे ही नाटकाच्या संदर्भात महत्वाचे असते. संविधानक, स्वभावचित्रणे, नेपथ्य, प्रकाशयोजना इ. नाटकाचे घटक असलेतरी संवाद हा नाटकाचा आत्मा असतो. तसे पाहिलेतर कथा कादंबरीत संवाद असतात. पण ते नाटकाप्रमाणे साक्षात, प्रत्यक्ष व समोरासमोर नसतात. पात्रांच्या संवादातून नाटकाच्या सर्व घटकांची अंतर्गत संघटना बांधली जाते. मधु कुलकर्णी म्हणतात, "नाटकाला जसे वाङ्मयीन मूल्य असते, तसेच प्रायोगितेचे मूल्य असते. त्यामुळे नवनवीन प्रयोग करण्याला, विशेषतः अभिव्यक्तीचे प्रयोग करण्याला भरपूर संधी असलेला हा वाङ्मयप्रकार आहे."[१२२]

तेंडुलकरांनी "शांतता कोर्ट।" नाटकातील स्त्री समस्या चित्रीत करण्यासाठी जी भाषा वापरली आहे ती व्यक्तिरेखांशी इमान राखणारी व त्यांचे जीवन चिंतन व्यक्त करणारी आहे. त्यांचे नाट्यलेखन आशयसंपन्न आहे. अभिव्यक्तीतून त्यांच्या शब्दकलेचे सामर्थ्य जाणवते. नाट्यलेखनात त्यांनी विविध प्रयोग केले. परंतु तेंडुलकर म्हणतात, "प्रयोगासाठी प्रयोग मला भावत नाहीत. नाटक लिहीत असताना मी त्यात पूर्णपणे गुरफटलेला असतो. नाटक लिहून हातावेगळे केल्यानंतर नाटकात आणि माझ्यातअंतर पडते." त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी जाणीवपूर्वक, अगदी करायचे म्हणून "प्रयोग" केले नसलेतरी नाटकाचे प्रायोगिकतेचे मूल्य ओळखून त्यांनी नाटयलेखन केलेले आढळते व तेच त्यांचे "नवप्रयोग" ठरले. त्यादृष्टीने त्यांना"शांतता। कोर्ट"नाटक महत्वाचे वाटते.[१२३] प्रस्तुत नाटकातील संवादलेखन नव्या वळणाचे आहे. तेंडुलकरांनी मराठी नाटककारांच्या पूर्व परंपरेसारखे, चटपटीत, आकर्षक., पल्लेदार,भावुक पध्दतीने संवादलेखन करण्याचा मोह टाळला आहे. साधेपणा व रोखठोकपणा हे तंत्र त्यांनी स्वीकारलेले दिसते. त्यांच्या नाटकावर इब्सेन तंत्राचा प्रभाव जाणवतो. माधव मनोहर यांना एकमेव तेंडुलकर हेच इब्सेनतंत्राचा स्वीकार करणारे नाटककार वाटतात.[१२४] तेंडुलकरांनी समाजातील व्यक्तींचे व परस्पर संबंधाचे यथातथ्य दर्शन संवादातून घडविले आहे.

तेंडुलकरांच्या संवादलेखनाचे वैशिष्टय सांगताना वि.भा.देशपांडे म्हणतात,"त्यांनी स्वतःची अशी वेधक परिणामकारी संवादशैली निर्माण केली. मिताक्षरता हा जसा त्यांच्या संवादशैलीचा विशेष आणि तसाच त्यामध्ये श्राव्यतेचा, दृश्यात्मकतेचा, मनोविश्लेषणाचा भाग ही तितकाच ताकदीने आला आहे."[१२५] नाट्यलेखनातील कृतिशीलता ही शब्दसंवादातही असते. यासाठी शब्दसंवाद त्या अंगाने यावा लागतो याचे भान तेंडुलकरांना आहे.

स·शि·भावे यांनी तेंडुलकरांना "नव्या संवादशैलीचे नाटककार"[१२६] म्हटले आहे· तेंडुलकरांनी संहितेला एक नवे रूप दिले· कथानक फुलविण्यासाठी "घटना प्रसंगाची गुंफण करून परिणामाचे शिखर गाठणे" हे संहितेचे जुने रूप बदलल्यामुळे, संहितेचा बंदिस्तपणा कमी होवून मोकळेपणा वाढला, परंतु त्या बरोबर व्यक्तिदर्शनाची जबाबदारी वाढली· त्यासाठी सूक्ष्मता, संमिश्रता, गुंतागुंत, वेगळेपणा, अंतर्विरोध हे सारे दाखवून व्यक्तीच्या अप्रगट अंतर्मनाचे भान ठेवायला हवे, व्यक्ती-व्यक्तीच्या संबंधामध्ये संवाद, सुसंगती यांचा अभाव आहे, हे दाखवायला हवे· हे सारे दाखवायचे तर संवाद खोल, अर्थगर्भ, व स्वाभाविक हवेत, याची जाण तेंडुलकरांच्या संवादलेखनात आढळते·

नव्या पध्दतीच्या संवादाने संगतवार गोष्ट सांगण्याचे काम नाकारले तसेच सुसंगत व पूर्ण व्यक्तिदर्शनाऐवजी जीवनाचे तुकडे नाट्यरूप म्हणून सादर केले· तेंडुलकरांनी ६५ ते ७५ या दशकात नाट्यरूपाच्या प्रात्यक्षिकरणाचे, तसेच संहितालेखनाचे अनेक नवे प्रयोग केले असे नमूद करून भावे उदाहरणादाखल "शांतता! कोर्ट" चा संदर्भ देतात· तेंडुलकरांनी, नाट्याची समक्षता प्रेक्षकावर प्रचंड परिणाम करते हे आळखून जीवनाचे तुकडे नाट्यरूप म्हणून सादर केले· जीवनात एक वरवरची सुबोधता भासते· तशी सुबोधता त्यांनी निवडलेल्या तुकड्यात आहे, हे तुकडे प्रेक्षक वाचकांना धक्के देतात·[१२७] "शांतता! कोर्ट" मधील बेणारेची समस्या म्हणजे तिच्या जीवनातील एक विशिष्ट भाग आहे· तेंडुलकर ही समस्या विचारात घेवून बेणारेचे व्यक्तिदर्शन घडवितात· हे तिचे संपूर्ण व सुसंगत व्यक्तिदर्शन- म्हणजे आई-वडील,भाऊ-बहीण त्यांचे व्यवसाय इ·, तिचे व्यावसायिक संबंध- असे करीत नाहीत· कुमारी मातृत्वाची समस्या समोर ठेवून नाटकातील घटना ते वेगाने घडवितात व प्रसंग उभे करतात· त्यातूनच प्रेक्षक-वाचकांना धक्के देतात· धक्क्यांचे मूळ शोधण्यासाठी प्रेक्षक-वाचक तर्क लढवितो· "शांतता! कोर्ट"मधील पहिली धक्का देणारी घटना म्हणजे समूहाने "प्लॅन"[१२८] करून बेणारेला आरोपी करणे व तिच्यावर भ्रूणहत्येचा आरोप ठेवणे· मग या आरोपाच्या-म्हणजेच समस्येच्या अनुषंगाने येणा-या संवादातून ते विलक्षण मनोवेधक प्रसंग उभे करतात· त्यातून समस्येचे चित्रण परिणामकारक होते·

"शांतता! कोर्ट" मधील संवाद अर्थपूर्ण व मिताक्षरी आहेत, संवादाना एक प्रकारची सहजता आहे· ते नाटकी नाहीत· तेंडुलकरांनी शाब्दिक मोह टाळला आहे· शाब्दिक कोट्यातून विनोद निर्माण होत असला तरी व्यक्तिचित्रणाला नाटकीपणा येण्याचा

संभव असतो· जी भाषा व्यक्ती व्यवहारात बोलते, तीच भाषा तेंडुलकर पात्राच्या तोंडी देतात· त्यांचे संवाद कृत्रीम आलंकारीक भाषेने नटलेले नसतात· ते सहज, प्रभावी व प्रत्ययकारी असतात· व्यक्तिरेखेच्या व्यक्तिमत्वाशी,व्यवसायाशी निगडीत असतात·· त्यांच्या अर्थगर्भ व स्वाभाविक संवादांचे नमुने पाहूया·

१ ) संवाद [१२९]

| | | |
|---|---|---|
| बेणारे | : | तुम्हा मंडळींना मी एक गंमत सांगू का? अं·? मी लहान होते तेव्हा अबोल होते· नुसतं पुष्कळ पुष्कळ ठरवत असायची . मी-स्वतःशीच· कुणाला नाही सांगायची· आणि काहीही झालं की रडायची· |
| पोंक्षे | : | म्हणजे आता आहात त्याच्या अगदी विरूध्द· |
| बेणारे | : | हो ना, तुम्हाला आहे ठाऊक सामंत·· |
| सामंत | : | (एकदम) हो-म्हणजे नसेल सुध्दा···नसेलच·· |
| बेणारे | : | माझ्याप्रत्येक पुस्तकाला छान कव्हरविव्हर घालून मी शाळेच्या पहिल्यादिवशी पहिल्या पानावर खूप वळणदार, बारीक अक्षरात फुलबिलं काढून लिहून ठेवायची····· द ग्रास इज ग्रीन - द रोज इज रेड - धिस बुक इज माइन - टिल आय ॲम डेड! टिल आय ॲम डेड···· आणि पुढ काय झाल सांगा·· |
| सामंत | : | काय झालं? |
| बेणारे | : | एकेक पुस्तक फाटून कुणास ठाऊक कुठ गेली आणि मी आहे. आय ॲम नॉट डेड! नॉट डेड! द ग्रास इज स्टिल ग्रीन, द रोज इज स्टिल रेड - बट आय ॲम नॉट डेड (हसत सुटते)· |

वरील संवादातील "पुस्तक" हे बेणारेच्या जीवनाचे प्रतीक आहे· बेणारेच्या व्यक्तिगत आयुष्यातील दुःख, तिची समस्या तेंडुलकरांनी मोठया अर्थपूर्णरितीने चित्रीत केली आहे·

२ ) संवाद [१३०]

| | | |
|---|---|---|
| सौ·काशीकर | : | पुढ सांगा हो तुम्ही सामंत· |
| बेणारे | : | नाही! आधी बस्स करा· हे सगळं! बस्स करा! |
| सामंत | : | (गोंधळून) पण काय झालं? |

| | | |
|---|---|---|
| बेणारे | : | हे थांबल पाहिजे· त्यातलं अक्षरदेखील खरं नाही आहे· |
| सामंत | : | हो ना· |
| बेणारे | : | बनावट आहे सगळं! खोट आहे! |
| सामंत | : | बरोबर· |
| बेणारे : | : | धादांत असत्य बोलताय तुम्ही? |
| सामंत | : | तर {मागे धरलेले पुस्तक काढून दाखवीत} म्हणजे यातलचं तर सगळं म्हणतोय मी· |
| सुखात्मे | : | मिस्टर सामंत, "विकट हास्य"- पुढं काय झालं? |
| बेणारे | : | यापुढं एक अक्षर उच्चारलं गेल तर मी निघून जाईन· |
| सुखात्मे | : | मिस्टर सामंत· |
| बेणारे | : | हे- सगळं मोडून तोडून टाकीन, चक्काचूर होईल सगळा, चक्काचूर होईल· |
| सौ·काशीकर | : | अग, पण तुझा वाण एवढा चोख आहे तर एवढी अकाडतांडव का करतेस तू बेणारे? |
| बेणारे | : | माझ्यावर जाणूनबुजून काहीतरी डाव टाकलाय तुम्ही! कट रचलाय! |

मिताक्षरी संवादातून,नाटकाला गती देण्याचे विलक्षण सामर्थ्य वरील संवादात दिसते· एका असहाय्य स्त्रीची समाज कशी कोंडी करतो याचे चित्रण येथे येते· शिवाय सामंताचा भाबडेपणाही या संवादातून सुचित होतो·

२ संवाद[१२१]

| | | |
|---|---|---|
| कर्णिक | : | हॅं! फारच वेळ गेला की! |
| सौ·काशीकर | : | वेळचं मेलं भानचं राहिल नाही- तर काय? |
| पोंक्षे | : | व्हाटस् द टाईम? काळोख पडला· |
| काशीकर | : | रोकडे, कार्यक्रमाची वेळ सांभाळण्याचं काम तुझ्याकडे आहे· करीत काय होतास इतका वेळ? नालायक कुठला? |
| सुखात्मे | : | जाऊ द्या काशीकर· बाकी मजा आला पण! कसं अगदी खरी केस लढल्यासारखं वाटलं! |

मुर्दाड समाजाचं चित्रं वरील संवादातून स्पष्ट होते. आपल्या खेळात बेणारेची काय अवस्था झाली याचे सोयरेसुतक या समूहाला नाही. एका असहाय्य स्त्रीला ही मंडळी संघटित होवून छळतात. तिचा बळी घेवून सहज बाजूला होतात. यातील "काळोख पडला" हे पोंक्षेचे उद्गारही मार्मिक आहे. बेणारेच्या जीवनाचा शेवटच त्यातून सुचित होतो. संवादातून सहज येणा-या शब्दांनाही मोठा अर्थपूर्ण संदर्भ असल्याचे आढळते. उदा. "मी गोष्ट सांगू का? मुलांनो, बसा. एक होता लांडगा."[१३२] लांडगा हा शब्द सामंत सोडून, बेणारेचा मामा किंवा प्रा. दामले किंवा समूहातील व्यक्तींच्या संदर्भात असेल. पण तो अर्थपूर्ण आहे.

संवादलेखनाच्या सामर्थ्यामुळेच प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण प्रत्ययकारी झाले व नाटकाला मोठी उंची प्राप्त झाली आहे. प्रस्तुत नाटकामध्ये एक दीर्घ संवाद आहे. तो म्हणजे बेणारेचे स्वगत. जुन्या नाटकातील स्वगताचे तंत्र तेंडुलकरांनी वापरले आहे. व्यक्ती अंतर्मनाचे दर्शन घडविण्यासाठी आणि दबलेल्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी, त्यांनी स्वगताचे तंत्र वापरलेले आढळते. तर्कशास्त्राच्या अंगाने येणा-या परंतु सहजतेने लयबध्द झालेल्या ओघवत्या संवादशैलीचा अविष्कार येथे घडतो. "येणारा प्रत्येक क्षण कसा नवा अपूर्वाईचा असतो. आपणच आपल्याला नवे होतो. आकाश, पक्षी, ढग, एखाद्या वठलेल्या झाडाचा हळूच डोकावणारा एकच भाग आणि खिडकीचा हलता पडदा नि भोवतालची शांतता नि लांबचे बारीकसारीक एकेक आवाज नि इस्पितळातल्या औषधांचा दर्प - तो देखील जीवनानं नुसता रसरसलेला वाटतो. जीवन जणू चौफेर भरून एकटया आपल्यासाठी गातयं असं वाटतं. हुकलेल्या आत्महत्येतला आनंद फार मोठा असतो. जगण्यातल्या वेदनेहून मोठा (दीर्घ श्वास घेऊन) प्राण उधळावा तेव्हाच तो असल्याचं भाग्य लक्षात येतं. प्राण प्राणापलीकडं जपावा तेव्हाच तो उधळण्याच्या लायकीचा असल्याचं पटतं."[१३३] "मनान केलेल्या भक्तीसाठी देहाचा नैवेद्य झाला आणि तेवढा घेवून माझा बुध्दिमान देव चालता झाला."[१३४] "त्यानचं तुला एक अतिशय सुंदर, खूप स्वर्गीय, तृप्त क्षण दिला होता...त्या क्षणाचा साक्षी एक कोवळा कोवळा अंकूर..त्याला आई हवी त्याला हक्काचे वडील हवेत.. त्याला घर हवं, संरक्षण हवं, प्रतिष्ठा हवी"[१३५] हा बेणारेचा संवाद प्रेक्षक-वाचकांच्या काळजाला भिडावा इतका भावगर्भ आहे. बेणारेची समस्या थेट अंतर्मनात पोहचवून आपल्याला अंतर्मुख करावे, असे सामर्थ्य तेंडुलकरांच्या संवादशैलीत आहे.

तेंडुलकरांनी माणसाच्या मनाचा, परस्पर संबंधाचा सखोल विचार केला. त्यांचे जीवनविषयक तत्वज्ञान संवादातून प्रकट होते. परंतु डॉ. धोंगडे मात्र, "तेंडुलकरांना स्वतंत्र असे जीवनविषयक तत्वज्ञान नाही. व्यक्ती विरूध्द परिस्थिती हा त्यांचा आवडता विषय. पण ते तत्वज्ञान नव्हे"[१३६] असे मत मांडतात, तसेच तेंडुलकरांची तीन नाटके {शांतता, गिधाडे, सखाराम} या लेखात द.भि.कुलकर्णी म्हणतात, "तेंडुलकरांचीही नाटके समग्र जीवनध्यान चित्रीत करणारी नाटके न ठरता जीवन विकृतीचे,कधी जुजबी स्पष्टीकरणासह चित्रण करणारी नाटके ठरली."[१३७] "शांतता! कोर्ट" चा विचार करता ही मते पटत नाहीत. प्रस्तुत नाटकातून तेंडुलकरांचे जीवनविषयक चिंतन विविध विधानाव्दारे प्रकट होते.

- सर्व वेळ माणसांनी उगीच लांब नाहीतर चौकोनी चेहरा करून कशाला जगायला हवे? हसावं, खेळावं, गावं, जमलं आणि नाचू दिलं तर नाचावंसुध्दा..[१३८] - बेणारे

- आयुष्य कुणासाठी नसतं. ते स्वतःसाठीच असतं.[१३९] - बेणारे
- माणसानं काहीतरी ध्येय ठेवावं- 'अनंत आमुची ध्येयासक्ती' असा व्यवहार हवा.[१४०] - काशीकर

- आयुष्य हीच आज एक गुंतागुंतीची गोष्ट झाली आहे.[१४१] - कर्णिक
- जीवन हा टरटरा फाटत जाणारा ग्रंथ आहे. जीवन म्हणजे स्वतःलाच डंख करणारा महाविषारी सर्प आहे. जीवन म्हणजे विश्वासघात आहे... जीवन म्हणजे रखडपट्टी आहे.. जीवन म्हणजे काहीच नाही असं काहीतरी किंवा काही तरीच आहे असं काहीच नाही.[१४२] - बेणारे
- जीवन ही एक महाभयंकर गोष्ट आहे.[१४३] - बेणारे
- आयुष्य सीधंसाधं नाही. माणसं फार क्रूर होवू शकतात. आपली रक्ताची माणसंसुध्दा आपल्याला समजून घेवू इच्छित नाहीत. या जीवनात फक्त एकच गोष्ट सर्वमान्य आहे - शरीर![१४४] - बेणारे
- भावना ही सर्वांच्या मते फक्त हळवं होऊन बोलण्याची गोष्ट.[१४५] - बेणारे
- हे विसाव्या शतकातील सुसंस्कृत माणसाचे अवशेष..[१४६] - बेणारे

शरीर सगळा घात करतं आहे·· या शरीराची किळसं येते मला आणि फार प्रेम वाटतं त्याच्याबद्दल·[१४७] - बेणारे

यासारख्या विधानातून तेंडुलकरांचे जीवनविषयक तत्वज्ञान व्यक्त होते· जुन्या आदर्शांचे व त्यातून निर्माण झालेल्या समस्येचे चित्रण करण्यासाठी हे तत्वज्ञान उपयुक्त ठरते·

नाटकाची दृश्यात्मकता आणि श्राव्यता लक्षात घेता, प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्येच्या चित्रणासाठी उपयुक्त ठरत असलेल्या नेपथ्य, प्रकाश, संगीत योजना यांचा विचार करणे आवश्यक आहे· पुंडलीकांच्या मते, "नाटक ही साहित्याशी जैविक संबंध असलेला पण तरीही स्वायत्त अशी कला आहे· अनुभवाचे दृश्य आणि श्राव्य अभिनयनिष्ठ रूप म्हणजे नाटक··· नाटक वाचत असतानासुध्दा एक रंगमंच आपल्या मनामध्ये उभारला जात असतो· थोडक्यात नाटकातील अनुभवामागची साहित्यसौंदर्याची मूल्य आणि रंगभूमीवरची प्रायोगिक मूल्ये ही परस्परांशी अविभाज्यपणे निगडीत असतात·"[१४८] संहितेतील अनुभव रंगमंचावर कसा आकारात यावा, याचा आराखडा नाटककाराने ठरविलेला असतो· याकामी दिग्दर्शकाचीही मोलाची मदत होत असते· "शांतता! कोर्ट" नाटकाच्या पुस्तकाच्या शेवटी, नेपथ्याच्या आराखडयाचे चित्र[१४९] व "दिग्दर्शकाच्या दृष्टिकोनातून" हा अरविंद देशपांडे यांचा लेख समाविष्ठ केला आहे· तसेच प्रकाश, संगीतयोजनेच्या संदर्भात काही कंससूचनाही दिल्या आहेत· त्या आधारे, प्रस्तुत नाटकांचा विचार करूया·

शांतता! कोर्ट·· मधील आरोपीचा पिंजरा हा प्रेक्षकांच्या जवळ म्हणजे फुल लाईटस् जवळ आहे· तर साक्षीदाराचा पिंजरा हा आरोपीच्या विरूध्द बाजूला, परंतु न्यायाधीशांच्या टेबलाजवळ आहे· बेणारे डाव्या बाजूला व तिच्याखेरीज सर्व पात्रे उजव्या बाजूला असे चित्र दिसते· त्यातून, "सावज विरूध्द शिकारी"[१५०] असे स्वरूप त्या चित्राला आपोआपच येते· साक्षीदारांच्या पिंज-यामागे मुख्य दरवाजा, न्यायाधीशांच्या आसना जवळच आतला दरवाजा आहे· न्यायासनासमोर वकिलांचे टेबल आहे· मुख्य दरवाजाच्या शेजारच्या दोन खिडक्यांच्या मध्ये खालील बाजूला, बैठकीसाठी बाक ठेवलेला आहे· आरोपीला बाहेर वा आत जायचे असेल तर स्टेज ओलांडून जावे लागावे, अशी एकूण मांडणी आहे·

"न्यायाधीश होण्याचा मान प्रत्येक व्यक्तीने घेतला आहे"[१५१] हे सूचित करण्यासाठी साक्षीदार न्यायाधीशांच्या आसपास दाखविले आहेत· अपेक्षित परिणाम साधण्यासाठी काही क्लुप्त्या दिग्दर्शकांनी वापरल्या आहेत· उदा·पोंक्षेच्या पहिल्या साक्षीत· त्यांचे लग्न जमविण्याच्या प्रयत्नांचा उल्लेख करताच बेणारे दचकते· तिचे हे दचकणे प्रकर्षाने नजरे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आणण्यासाठी, लग्नाचा उल्लेख येताच पर्स खाली पडल्याचे व ती क्षण दोन क्षण स्तब्ध झाल्याचे दाखविले आहे.[१५२] सामंताच्या साक्षीपासून, गंमतीच्या खेळाचे रूप पालटत जाते व त्याचे शिकारीत परिवर्तन होत जाते. सामंत अजाणतेपणातून, प्रत्यक्ष बेणारेच्या वास्तव समस्येला हात घालतो. समुहाला चेव चढतो. "आता खेळ संपला, आता जीवघेणी शिकार सुरू झाली" ही जाणीव सामंताच्या साक्षीच्या वेळी उभी करण्यासाठी, प्रत्येक पात्र या ना त्या कारणाने सामंताकडे जावू लागल्याचे दाखविले आहे. त्यांच्यातला पशू जागा झालेला आहे. प्रत्येक पात्राचा स्वतंत्रपणे विचार केला तर ती भ्याड व सामान्य आहेत. पण ती सर्व समूह म्हणून एकत्र आली की त्यांच्यातला हिंस्त्र पशू, सावजावर झडप घालण्यासाठी कसा सावध होतो. याचे मार्मिक व भेदक दर्शन घडते.

प्रकाश योजना व संगीत यांचा "स्वगता" मध्ये कल्पकतेने वापर केला आहे. "स्वगताचा" अपवाद वगळता, संपूर्ण नाटकात प्रकाश योजना नॅचरल आहे. त्यात इफेक्टस् कुठेच नाहीत.[१५३] घडयाळ्याच्या टिक् टिक् आवाजाचाही मोठया सुचकतेने वापर केला आहे. काशीकर निकाल वाचताना, त्यांच्या मागच्या बाजूने लाल प्रकाश टाकून त्यांची संबंध सावली बेणारेवर दाखविली आहे, बेणारे आता पुरती नष्ट झाली हे दाखविण्यासाठी.[१५४] नाटकाच्या अखेरीस कोठून तरी "**चिमण्रीस मग पोपट बोले**" या बालगीताचे, बेणारेच्या आवाजातले सूर ऐकू येवू लागतात.[१५५] निश्चेष्ट पडलेल्या बेणारेवर फक्त प्रकाश, बाकी रंगमंच अंधारात असताना संथपणे पडदा पडतो. प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण प्रभावीरितीने व अपेक्षित परिणामासह साकार होण्यासाठी नेपथ्य, प्रकाश, संगीत, ध्वनी योजना इ. घटकांचा वाटाही महत्वाचा असतो, हे स्पष्ट दिसते.

**निष्कर्ष ::::** तेंडुलकरांचे "**शांतता! कोर्ट चालू आहे**" हे नाटक सामाजिक परिस्थितीचे व त्या अनुषंगाने येणा-या कुमारी मातृत्वाच्या समस्येचे प्रभावी चित्रण करणारे नाटक आहे. रूढी, परंपरा, समाजाचा दांभिकपणा, खोटया प्रतिष्ठेच्या कल्पना, मनोविकृततून येणा-या काम, हिंस्त्रप्रवृत्ती, यांचे विदारक चित्रण या नाटकामधून केले आहे. नाटकाला असणारा सामाजिक पाठिंबा लक्षात घेवून तेंडुलकरांनी वास्तव जीवनातली समस्या मोठया कल्पकतेने, परिणामकारी संवादशैलीने व सखोल चिंतनाने प्रस्तुत नाटकाव्दारे मांडली आहे. त्यांच्या कल्पकतेला वास्तवाची बैठक आहे. त्यांच्या नाटयधर्मी प्रतिभाशक्तीला प्रगल्भ बुध्दिमत्तेची जोड आहे आणि त्यांच्या शोधक जीवनदृष्टीला नव्या विचारप्रणालींची, नव्या जीवनमूल्यांची ओढ आहे.

एका अभिरूप न्यायालयाची कल्पकतापूर्व मांडणी करून प्रत्यक्ष जीवन व्यवहारात व न्यायालयातही कुमारी मातृत्वाच्या समस्येने ग्रासलेल्या स्त्रीला योग्य न्याय तर मिळत नाही, परंतु तिची उलट तपासणी होवून, अब्रू नुकसानी करून क्रूर छळवणूक केली जाते· न्यायालयाचे दरवाजेही तिच्यासाठी बंद असतात· अशावेळी वाटयाला येणारी विटंबना ती सहन करू शकत नाही·यासाठी मानवतावादी वृत्तीची गरज असते· परंतु समाजात त्या वृत्तीचा अभाव असतो· वेदना पोटात घेवून, पोटातल्या अपत्यासाठी ती जगू इच्छित असली तरी समाज तिचे जगणे कसे असह्य करतो याचे भेदक चित्रण तेंडुलकरांनी "शांतता! कोर्ट चालू आहे" नाटकात केले आहे·

## xxx संदर्भ टीपा xxx

### प्रकरण तिसरे

१ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", मौज प्रकाशन, मुंबई,तृ·आ· १९७९, पृ· ७

२ तत्रैव, पृ· ८

३ कुलकर्णी-कर्नाड इ·नी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत, ललित,मे, १९७६, पृ· १८

४ तत्रैव, पृ· १९

५ तत्रैव, पृ· १९

६ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे",नाटकाची श्रीराम लागू कृत प्रस्तावना, उ·नि·पृ· ११

७ तत्रैव, पृ· १२

८ तत्रैव, पृ· १२

९ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ· ९९

१० तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", नाटकाची श्रीराम लागू कृत प्रस्तावना, उ·नि·पृ· २०

११ तत्रैव, पृ· २०

१२ तत्रैव, पृ· २०

१३ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ· ६

१४ तत्रैव, पृ· ६

१५ तत्रैव, पृ· २६

१६ तत्रैव, पृ· २९

१७ तत्रैव, पृ· ३५

१८ तत्रैव, पृ· ४४

१९ तत्रैव, पृ· ५[illegible]

२० तत्रैव, पृ· ५०

२१ तत्रैव, पृ· ५६

२२ तत्रैव, पृ· ५६

२३ तत्रैव, पृ. ५७

२४ तत्रैव, पृ. ६४

२५ तत्रैव, पृ. ६७

२६ तत्रैव, पृ. ७४

२७ तत्रैव, पृ. ८४

२८ तत्रैव, पृ. ८७

२९ तत्रैव, पृ. ८८

३० तत्रैव, पृ. ८९

३१ तत्रैव, पृ. ९४

३२ तत्रैव, पृ. ९४

३३ तत्रैव, पृ. ९४

३४ तत्रैव, पृ. ९६

३५ भवाळकर तारा, "प्रियतमा", चेतश्री प्रकाशन, अंमळनेर, १९८५, पृ. ३२

३६ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ.९८

३७ तत्रैव, पृ. ९९

३८ तत्रैव, पृ. ९६

३९ सोमण अंजली, "साहित्य आणि सामाजिक संदर्भ", प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. ११

४० तत्रैव, पृ. १०; ११

४१ पवार-हातकणंगलेकर (संपा.), "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ. १०९

४२ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ. ६

४३ देशपांडे गो.पु., "शांतता! कोर्ट चालू आहे" काही विचार, सत्यकथा, फेब्रु., १९७२, पृ.२४

४४ तत्रैव, पृ. २४

४५ "प्रतिष्ठान" मासिक, "शांतता! कोर्ट चालू आहे", चे परीक्षण; मार्च-एप्रिल १९६९, पृ. ३१

४६ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ. ९४

४७ तत्रैव, पृ. ९५

४८ तत्रैव, पृ. ९३

४९ देशपांडे गोविंद पुरुषोत्तम, "शांतता! कोर्ट चालू आहे" : काही विचार, उ.नि.पृ. २४

५० तत्रैव, पृ. २४

५१ तेंडुलकर विजय, "शांतता। कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ. ३

५२ परूळेकर आशा, "आधुनिक स्त्रीच्या समस्या", मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,१९९२, पृ.५७

५३ तावरे-शाळिग्राम ﴾संपा.﴿,"मराठी नाटक आणि मनोविकृती",विमल प्रकाशन,पुणे, १९९०, पृ. ११८,११९

५४ तत्रैव, पृ. ७८ .

५५ कुलकर्णी अरविंद वामन,"शांतता।कोर्ट चालू आहे :एक मानसशास्त्रशुध्द नाटयव्युह", प्रतिष्ठान, मे-जून १९९२ , पृ.१५

५६ तेंडुलकर विजय,"शांतता।कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ.३

५७ तत्रैव, पृ.२

५८ तत्रैव, पृ.९४

५९ कुलकर्णी अरविंद वामन,"शांतता।कोर्ट चालू आहे"एक मानसशास्त्रशुध्द नाटयव्युह", उ.नि.पृ. १५

६० तत्रैव, पृ.१६

६१ तेंडुलकर विजय, "शांतता कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ. ९२

६२ तत्रैव, पृ. ९५

६३ तत्रैव, पृ. १०

६४ कुलकर्णी द.भि.,"तेंडुलकरांची तीन नाटके",समाजप्रबोधन पत्रिका, नोव्हे, डिसें., १९७२, पृ. ३२

६५ कुलकर्णी अरविंद वामन, "शांतता।कोर्ट चालू आहे :एक मानसशास्त्रशुध्द नाटयव्युह", उ.नि.पृ. १६,१७

६६ तेंडुलकर विजय, "शांतता।कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ. ३४

६७ तत्रैव, पृ. ३२

६८ तत्रैव, पृ. ९५

६९ तत्रैव, पृ. ९३

७० तेंडुलकर विजय, "वृत्तपत्रात प्रसिध्द झालेला विचार",दै.सकाळ,पुणे ४ नोव्हें १९९२, पृ. ५

७१ तेंडुलकर विजय,"शांतता।कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ. २

७२ तत्रैव, पृ. ५८

७३ तत्रैव, पृ. ५९

७४ तत्रैव, पृ. ६०

७५ तत्रैव, पृ. ६०

७६ तत्रैव, पृ. ५३

७७ तत्रैव, पृ. ५३

७८ कुलकर्णी अरविंद वामन,"शांतता! कोर्ट चालू आहे" : एक मानसशास्त्रशुध्दनाटयव्युह", उ.नि.पृ. १७

७९ तेंडुलकर विजय,"शांतता! कोर्ट चालू आहे", उ.नि.पृ. ५९

८० कुलकर्णी अरविंद वामन,उ.नि.पृ. १८

८१ अत्रे प्रभाकर यांनी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत,अमृत एप्रिल १९७०, पृ.१६३

८२ तत्रैव, पृ. १६४

८३ कुलकर्णी-कर्नाड इ.नी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत, ललित, मे, १९७६, पृ. २२

८४ देशपांडे वि.भा.{संपा.}, "रंगयात्रा",नाटयसंपदा प्रकाशन, मुंबई, १९८८, पृ. ४२

८५ तत्रैव, पृ. ४२

८६ कुलकर्णी-कर्नाड इ.नी घेतलेली विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत,उ.नि.पृ. १८

८७ बर्वे चंद्रशेखर, "तेंडुलकरांची नाटके", राजहंस प्रकाशन, पुणे, १९८५,पृ. ७१

८८ तेंडुलकर विजय, "शांतता! कोर्ट चालू आहे", उ.नि. ६

८९ तत्रैव, पृ. ६

९० धोंगडे रमेश, "तेंडुलकरांची नाटके, पाठय व प्रयोग", दिलीपराज प्रकाशन, पुणे,१९७९ , पृ.४८

९१ पै-तेंडुलकर यांनी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत"साहित्यातून सत्याकडे", डिंपल पब्लिकेशन, वसई रोड स्टेशन,१९८८, पृ.१२१

९२ तत्रैव, पृ. १२१

९३ धोंगडे रमेश, "तेंडुलकरांचे नाटक, पाठय व प्रयोग", उ.नि.पृ. ५३

९४ तत्रैव, पृ. ५३

९५ पाध्ये प्रभाकर, रमेश धोंगडे कृत,"तेंडुलकरांचे नाटक,पाठय व प्रयोग"ग्रंथावरील भाष्य, उ.नि.पृ.१८

९६ तेंडुलकर विजय, "शांतता|कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ· २४

९७ धोंगडे रमेश, "तेंडुलकरांचे नाटक, पाठय व प्रयोग, उ·नि·पृ· ५२

९८ कुलकर्णी अरविंद वामन "शांतता कोर्ट चालू आहे":एक मानसशास्त्रशुध्द नाटयव्युह", उ·नि·पृ· १८

९९ "प्रतिष्ठान" मासिक, "शांतता|कोर्ट चालू आहे" चे परीक्षण, मार्च-एप्रिल १९६९, पृ·३२

१०० कुलकर्णी द·भि· "तेंडुलकरांची तीन नाटके", उ·नि·पृ· ३३

१०१ तेंडुलकर विजय "शांतता|कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ·९३

१०२ कुलकर्णी द·भि· "तेंडुलकरांची तीन नाटके", उ·नि·पृ· ३३

१०३ पाटणकर रा·भा·,"शांतता|कोर्ट चालू आहे", फसलेच |पण कां?," आलोचना, जाने· १९६९ ,पृ·८

१०४ धोंगडे रमेश, "तेंडुलकरांचे नाटक, पाठय व प्रयोग", उ·नि·पृ· ५६

१०५ तेंडुलकर विजय, "शांतता|कोर्ट चालू आहे," उ·नि·पृ·९३

१०६ तत्रैव, पृ· ९३

१०७ तत्रैव, पृ· ९२

१०८ तत्रैव, पृ· ७५

१०९ तत्रैव, पृ· ७५

११० तत्रैव, पृ· ७६

१११ तत्रैव, पृ· ७६

११२ तत्रैव, पृ· ७६

११३ तत्रैव, पृ· ६५

११४ देशपांडे गोविंद पुरूषोत्तम,"शांतता|कोर्ट चालू आहे:काही विचार",उ·नि·पृ· २३

११५ तेंडुलकर विजय, "शांतता|कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ· ८५

११६ तत्रैव, पृ· ६६

११७ तत्रैव, पृ· ८९

११८ तत्रैव, पृ· ४४

११९ तत्रैव, पृ· ९०

१२० तत्रैव, पृ· ९०

१२१ तत्रैव, पृ· ९१

१२२ कुलकर्णी मधु,"ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण", शुभदा-सारस्वत पब्लिकेशन, पुणे,१९८७, पृ·१२४

१२३ पै-तेंडुलकर यांनी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत,"साहित्यातून सत्याकडे", उ·नि·पृ· ५१२

१२४ मनोहर माधव,"मराठी नाटक थिटे का?,"वसंत बुक स्टॉल,मुंबई,१९८७ ,पृ·६८

१२५ पवार-हातकणंगलेकर §संपा·§,मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उ·नि·पृ· १३०

१२६ देशपांडे वि·भा·§संपा·§, "रंगयात्रा", उ·नि·पृ· ३६

१२७ तत्रैव,पृ·४२

१२८ तेंडुलकर विजय,"शांतता।कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ· २८

१२९ तत्रैव, पृ· ११

१३० तत्रैव, पृ· ५७

१३१ तत्रैव, पृ· ९७

१३२ तत्रैव, पृ·१२

१३३ तत्रैव, पृ· ९२

१३४ तत्रैव, पृ· ९४

१३५ तत्रैव, पृ· ९५

१३६ धोंगडे रमेश,"तेंडुलकरांचे नाटक,पाठय व प्रयोग", उ·नि·पृ· ११

१३७ कुलकर्णी द·भि·"तेंडुलकरांची तीन नाटके", उ·नि·पृ· ३५

१३८ तेंडुलकर विजय, "शांतता । कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ· १०

१३९ तत्रैव, पृ· १०

१४० तत्रैव, पृ· ४२

१४१ तत्रैव, पृ· ८१

१४२ तत्रैव, पृ· ९२

१४३ तत्रैव, पृ· ९२

१४४ तत्रैव, पृ· ९३

१४५ तत्रैव, पृ· ९३

१४६ तत्रैव, पृ· ९३

१४७ तत्रैव, पृ· ९५

१४८ पवार-हातकणंगलेकर (संपा.), "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप", उ·नि·पृ·११५, ११६

१४९ तेंडुलकर विजय,"शांतता।कोर्ट चालू आहे", उ·नि·पृ· १००

१५० तत्रैव: पृ· १०४

१५१ तत्रैव; पृ· १०४

१५२ तत्रैव, पृ· १०३

१५३ तत्रैव, पृ· १०५

१५४ तत्रैव, पृ· १०६

१५५ तत्रैव, पृ· ९८